म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें.
विषय नाटक
दा. क्र. १९८०२

IRBK-0119702

18 DEC 2004

13 JUL 2005



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.


29 JUN 1983
16 JUL 1983
22 JUL 1983
27 JUL 1983
12 AUG 1983
30 AUG 1983
5 SEP 1983
1 SEP 1983
22 SEP 1983
4 OCT 1983
7 NOV 1996
13 JAN 2001

(क्र. मा. प.)
५०००-१२-८२

वाचनालय नाटक
95702
२८/७/८३

दोन अंकी नाटक

IRBK-0119702




**व. पु. काळे**

मेनका प्रकाशन

मेनका प्रकाशन : २८६

आवृत्ति पहिली : १९८२

© १९८२ सौ. वसुंधरा काळे

प्रकाशक :
पु. वि. बेहेरे, मेनका प्रकाशन,
५६० नारायण, पुणे ४११०३०

मुद्रक :
वि. ना. भंडारे,
स्वानंद मुद्रणालय,
२०३ शनवार पेठ, पुणे ४११०३०

मूल्य दहा रुपये

मोती अँड मोती

व. पु. काळे

बंकीम, शुभदा, चिऊ आणि शमीम
या कुटुंबास——

# मोडी अँण्ड मोडी ( एक स्वगत प्रस्ताव )

ही एक भावनाटच कृती आहे. नाजूक, हळुवार, हलकेफुलकेपणाचं पांघरूण असलेली एक करुणरम्य नाटचकृती !

अतिरंजित घटनांना जागाच नाही. शक्यता असून जागा दिली नाही, असं नाही. शक्यताच नाही. शक्यता निर्माण झाली नाही. शक्यता निर्माण केली गेली नाही. कटाक्षानं बरं का ! नाहीतर या भावनाटचकृतीला सहन न होणारं अव-जडपण आणि बटबटीतपण आलं असतं. आणि नाटचकृतीची हानी झाली असती. ती चुरगळली असती. ही एका हळुवार अंतरंगांच्या आणि फणसासासारख्या बहि-रंगाच्या, जीवनात सहनशीलतेचा दैवानं अंत पाहिलेल्या एक सज्जनाची भावकथा आहे. व्यावहारिक कारण गैरसमजाला भरपूर, पण तसा गैरसमज विनाकारण अशी त्या सज्जनाची दयनीय स्थिती आहे. पण ते व्यावाहारिक कारण नाहीसं झालं आणि गैरसमजाचे ढग त्याच्या भावपूर्ण निवेदनानं क्षणार्धांत विसरून गेले. निर्माण झाला तो सहानुभूतीपूर्ण अश्रूंचा गहिवरून टाकणारा सुखद पर्जन्य ! त्यानं सर्व गैर-समजाची किल्मिषं धुतली गेली आणि सारेचजण झाले केवळ बधीर आणि अवाक्!

अशीच या सुंदर भावनाटचकृतीनं मनाची होणारी कलानंदाश्रू आणणारी स्थिती आहे. रसिक परत जाईल तो अशाच लोभनीय भावसमाधीतच ! म्हणून या भावनाटचकृतीचा आविष्कारही हळुवारपणानं, संयमित स्वरूपात पण योग्य आणि परिणामकारक भावप्रकटनासाठी नाटचकृतीचे पापुद्रे काढीत, ते सौम्य भावनाप्रकटनानं रंगवीत केला पाहिजे.

त्यासाठीच अंतरंगाचा शोध घेण्याचा मी प्रयत्न केला आहे. दृश्यप्रकटनात बारकावे भरण्याचा प्रयत्न केला आहे. साऱ्या नाटचकृतीचा शोध घेता-घेता अर्थ जाणून घेण्याचा प्रयत्न केला आहे. प्रत्येकाला स्वतंत्र प्रज्ञा असते असा माझा विश्वास आहे. म्हणून माझा शोध हाच प्रत्येकाचा असेल आणि असावा असं नाही. त्याला निराळा शोध जाणवला तर या भावनाटचकृतीचं विशालत्वच सिद्ध होईल. फक्त शोधाची एक जाणवलेली दिशा म्हणून दिग्दर्शनाबद्दलचं प्रकट चिंतन. कारण कुठल्याही नाटचकृतीच्या नव्याच नव्हे तर त्याच संचातल्या नव्यानं सादर केलेल्या दृश्याविष्काराचं दिग्दर्शन म्हणजे त्या नाटचकृतीच्या अंतरंगाचा नव्यानं केलेला शोधच आहे. तो एकाच दिग्दर्शकाचा असेल अथवा अनेक दिग्दर्शकांचा असेल. नाटचकृतीचं विशालत्व त्यानंच सिद्ध होतं, प्रस्थापित होतं आणि नव्या वाट-चालीच्या अदृष्ट दिशा दृश्य होतात आणि नाटचकृती नव्या-नव्या रंगानं प्रकट होत राहते.

# मोदी अँण्ड मोदी ( रसग्रहण-दिग्दर्शनाच्या दृष्टीने )

तशी एक वरवर साधी वाटणारी आणि शेवटी तंत्रदृष्टया अपेक्षित वाटणारी अनपेक्षित कलाटणी देऊन संपणारी कथा. त्यातली माणसं ओळखीची. पण तशी थोडी एकांतिकच. द्विमिती चित्रंच. आपापल्या चमत्कारिक पण प्रामाणिक फॅड्स्ना जपणारीच. त्यांचा बॉस एक पारशी. मोदी. रेकॉर्डस् तयार करणाऱ्या कंपनीचा मालक—मॅनेजर. तो त्रिमिती स्वभावचित्राचा भास दाखवणारा. त्याची व्यथा जाणवते पण उमगत नाही. आणि उमगते तेव्हा नाटचकृती संपतेच. कारण ती व्यथाच नाटचकृतीच्या मुळाशी आहे. म्हणूनच खरं म्हणजे ही करुणामय जीवन परोपकाराचं ब्रीद न सोडता, हसऱ्या मुखवटयानं जगणाऱ्या एका सज्जनाबद्दलची नाटचकृती आहे.

खरं म्हणजे ही नाटचकृती एकटचा मोदीचीच. केवळ तो एक प्रमुख भूमिका, एक प्रमुख स्वभावचित्र म्हणून नव्हे, तर या नाटचकृतीत दिसणारी सर्वच व्यक्ति-चित्रं म्हणजे मोदीच आहेत. होय ! मोदीच्या स्वभावविशेषातल्या निरनिराळ्या छटांची ती चालती-बोलती द्विमिती पण सगळी मिळून त्रिमिती मोदी साकार करणारी चित्रं आहेत. म्हणूनच नाटचकृतीचं 'मोदी अँण्ड मोदी' हे नाव फारच अन्वर्थक वाटतं. या नाटचकृतीतलं प्रत्येक व्यक्तिचित्र हळूहळू मोदी साकार करीत जातो आणि शेवटी प्रत्यक्ष मोदी येतो, तो या व्यक्तिचित्रांनी साकार केलेले आणि न केलेलेही स्वभावविशेष घेऊनच !

प्रथम दिसतो मोदीच्या ऑफिसचा देखावा आणि त्यात येतो तो शंकर, त्या ऑफिसातला गडी. गडयाची कामं म्हणजे लेजर नेऊन देणं, टेबलं साफ करणं, निरोप-चिठ्ठया पोहोचवणं, फोन-निरोप घेणं. ही कामं करणारा, म्हणून गडी. पण तोही मिस्कीलपणानं फोनवर बोलू शकतो, प्रत्यक्ष बोलू शकतो, थट्टा करू शकतो, सहानुभूतीनंही विचारपूस करू शकतो. मोदीची नक्कल करू शकतो. स्वच्छता, टापटीप यांची आवड असणारा, तशी ती राखायची धडपड करणारा मोदीच—हो कष्ट आणि कर्तव्यतत्पर दुसरा मोदीच !

मग येते ती ललिता. प्रेमविवाह ठरवलेली. पण प्रियकर लग्नानंतर तिच्या बिऱ्हाडी यायला, तिच्या अपंग बापाबद्दल सहानुभूती बाळगूनही जुन्या बिऱ्हाडात त्याला सांभाळत राहायला तयार नाही. म्हणून ओनरशिप ब्लॉक मिळवण्याची वाट पाहत झुरणारी सात्विक मुलगी. मोदी तिच्यात आपल्या पत्नीची प्रतिमा पाहतो. त्याला जशा स्वभावाची पत्नी हवी होती तशा पत्नीची. तिच्या बॉयफ्रेंड-मध्ये तो स्वत:च्या व्यथा पाहतो. ते जोडपं म्हणजे मोदीच्या मनाचे दोन तुकडेच आहेत. तो सारखा ललिताला विचारतो,

'घेशपांडे२२ लाडू कवा देल ?' थट्टेनं वरवर पण आंतरिक तळमळीनं, विव्हलतेन 'अरे जागा कवा भेटेल. तू तो बुढ्ढी होऊन जाएल ना !' असं वर थट्टेनं पण अंतरी विव्हलतेनं म्हणणारा मोदी अतृप्त आहे. त्यांच्या संसारात तो अपुरा राहिलेला किंवा अपुरेपणानं असह्य होणारा संसार पूर्ण झालेला पाहणार आहे. तोही त्यांच्या तरुणपणी नव्हाळीत फुलणारा, तृप्त होणारा, नर्म चेष्टाविनोद करणारा, भावुकतेनं रंगलेला आणि एकांतातल्या अगदी आंतरिक भावभावनांनी हळुवारपणानं हृद्य झालेला. त्या त्याच्या मानसिक संसारात तोच रसिक पती आहे आणि तोच रसिक पत्नी आहे. म्हणूनच त्याला ललिताजवळ एक फेव्हर मागायला तसा संकोच वाटत नाही. 'हनीमूनच्या वेळचा एकांतातला पति–पत्नीचा डायलॉग.' त्याचा तो भुकेला आहे. त्यानं इतर ऑफिस कर्मचाऱ्यांकडून रेकॉर्डेड डायलॉग्ज घेतले आहेत. घाटपांडेकडून 'त्याची बायको बोहारणीशी घासाघीस कशी करते' त्याचा, 'जोशीची बायको घरात काम करताना कशी गुणगुणते, जोशीला वाणसामानाची यादी कशी सांगते' याचा, जोशीकडून. 'साळवीची बायको भजनं कशी म्हणते' याचा साळवीकडून, 'फर्नांडिसची बायको तिच्या दोन वर्षांच्या मुलाशी कसं मुद्दाम बोबडं बोलते' याचा फर्नांडिसकडून, असे रेकॉर्डेड डायलॉग्ज मोदीनं घेतले आहेत. आणि त्या प्रेमळ, मायाळू, विलक्षण परोपकारी आणि विचित्रही अशा पारशाला–मोदीला, हे रेकॉर्डेड डायलॉग्ज त्या सर्वांनी विनाविकल्प दिले आहेत. कारण सर्वांना खात्री आहे की मोदी या टेप्सचा गैरवापर करणार नाही. मात्र तो या साऱ्या प्रकाराचा इतका भुकेला का ? हनीमूनच्या वेळच्या पति–पत्नी संवादाचा भुकेला का हे कोणालाही कळत नाही, माहीत नाही. मिसेस् मोदींचं नाव काढलं की मात्र एकदम तुसडचासारखा तो विषय झटकन् टाकतो. 'जा ! जा! काम कर ! जा ! काम कर !'–असं तिरसटासारखा म्हणतो. ते का ? मिसेस् मोदींना कुणीही कधी भेटू शकलं नाही. ते का ? याचा मात्र कोणाला उलगडा होत नाही. 'अत्यंत स्वच्छ, टापटिपीचं आयुष्य कंठणाऱ्या या प्रेमळ, मिस्किल, परोपकारी आणि शिस्तप्रिय पण चमत्कारिक गूढवलय भोवती असणाऱ्या, अभेद्य स्वभावाच्या पारशाच्या जीवनात एखादं आगळं स्त्री-रहस्य आहे की काय ?'–अशी शंका यावी, इतकं प्राधान्य ललिता या व्यक्तिचित्राला, या नाटचकृतीत आहे. (केवळ एकच स्त्रीपात्र आहे, त्याला काम जरा जास्त असावं म्हणून नव्हे.)

ललितानंतर येतात घाटपांडे. मोदीच्या प्रामाणिक आणि काटेकोरपणे शिस्तप्रिय पण अत्यंत प्रेमळ, दुसऱ्यांच्या व्यथांशी समरस होणाऱ्या, त्या व्यथा दूर करण्याचा प्रयत्न करू इच्छिणाऱ्या मोदीच्या या स्वभावविशेषाचं चित्र म्हणजे घाटपांडे. ललिताची व्यथा जाणून घेण, सचिनशी तिचा समझोता घडवणं, तुझ्या टेपचा दुरुपयोग होणार नाही, असं आवर्जून सांगणारा दुसरा मोदीच. ललितेशी,

पित्याच्या अपंगपणानं पित्याकडून होणाऱ्या कौतुकाला पारखं झालेल्या ललितेला, पितृसदृश प्रेमळपणानं, मायेनं वागून पित्याचं सुख देऊ इच्छिणारं मोदीचं मन म्हणजे घाटपांडे. म्हणूनच ' लाडू कवा देल ?' या प्रश्नानं विव्हल होणाऱ्या ललितेची व्यथा, घाटपांडे, म्हणजे मोदीचं मनच त्याला सांगतं, ' साहेब ! देशपांडेबाईंना तुम्ही लग्नाचं विचारू नका तिला त्रास होतो. ' दुसरं मोदीचं कुतूहल जागं झालेलं मन विचारतं, ' ती शादी नाय करेल काय ?' तिच्या पित्याच्या अपंगपणाची जाण घाटपांडे देतात. आणि मोदी तिला विचारून, तिचा संसार लागी लावण्याचा उपाय काढतो तो स्वतःला तिच्या पित्याच्या जागी पाहतो. संसारातल्या व्यथेनं, अर्धांगच निष्क्रिय झालेल्या स्थितीनं, मनानं, जीवनात अपंग झालेल्या मोदीला ललितेच्या पित्यात स्वतःची व्यथा दिसते. घाटपांडेमधून मोदीच आपले विशिष्ट स्वभावविशेष घेऊन ललितेशी बोलतो, वागतो.

सचिनमध्ये तो स्वतःला पाहतो. आपली पत्नी ललितेसारखी असती तर आपणही सचिनसारखेच असतो. अवखळ, रुसणारे, प्रेमाने रागावणारे, अधीर, नर्म-विनोदानं बहरणारे आणि पत्नीला बहरवणारे, असं आपलं मन तो सचिनरूपानं प्रकट करतो आहे. ललितेतलं रूप, वाणी, बुद्धी, मन आणि गुण यांनी संपन्न असं पत्नीरूपही तोच आहे. आणि सचिनही तोच आहे. म्हणून तर कधी न अनुभवलेला हनीमूनचा डायलॉग त्याला हवा आहे, तो विकृत इच्छा म्हणून नव्हे तर भुकेलं कुतूहल आणि अननुभूत सुखाची इच्छा म्हणून हवा आहे.

सोनाळकर म्हणजे स्वप्नाळू मोदीच आहे. स्वप्नरंजन, संपूर्ण भावसमृद्ध सुखी संसाराचं स्वप्नचित्र पाहणारा मोदी म्हणजे सोनाळकर. त्याची स्वप्नंही तशीच. व्यवहारातली लोकल धक्काबुक्कीची, व्यवहारी जीवनही दुर्दैवाच्या धक्का-बुक्कीचं. पण स्वप्नातलं जीवन कसं सुखाचं असतं. ' डोंबिवली लोकल रिकामी ? क्या बात है ! बसलो आरामात आणि आलो.' ' नो प्रेझेंट्स प्लीज ' लिहिण्याची पात्रता येणं म्हणजे ' हुंडा देण्याची परिस्थिती येणं.' ' स्वप्नात सारे फूटपाथ रिकामे दिसले, म्हणून खरंच मानून चालत निघालो आणि फूटपाथवर बसलेल्या विक्रेत्याच्या मालावर पाय पडला.' आणि ' पोट भरायची निकड असलेल्या एका जमातीनं पोट भरायची निकड असणाऱ्या दुसऱ्या जमातीला दिलेली माराची भेट' असं स्वप्न आणि सत्य यातला फरक किती विदारक आहे, हे सांगणारा सोनाळकर हा मोदीच्या स्वप्नरंजन करणाऱ्या मनाचाच एक पडसाद आहे. तो करुणरम्य आहे, पण वरवर हसरा आहे, विनोदाची डूब असलेला आहे. सिनेमाची तिकिटं देऊनही सिनेमाला न जाणाऱ्या सुखाच्या संधीची जाण देऊनही सुख न घेणाऱ्या सोनाळकरला, म्हणजेच आपल्याच पडछायेला मिस्कीलपणानं शिक्षा फर्मावतो. ' गिल्टी बिल्टी काय नाय ! आय वुइल सेंड यू टू अंदमान वुइथ शंकर !' सोनाळकरही गप्प बसतो.

साळवी हे मोदीच्या श्रद्धाळू मनाचं चित्र  मोदीचा तो स्वभावविशेष आहे. साळवीचा 'पांडुरग ! पांडुरंग !' हा जप मोदीच्याच विकल मनाचा टाहो आहे. आपल्या पत्नीच्या जागी तो परमेश्वरही पाहतो आणि हा परमेश्वर ऐकतही नाही आणि बोलतही नाही, असं पाहिल्यावर तो तुकारामाच्या आवलीसारखा त्याच्यावर रागावतो. 'अरे साळवी ! तुझा पांडुरंग काय तुज्याबरोबर वार्ता करते काय ? वार्ता करते ? तो तर बिलकुल डेफ अँण्ड डम् हाय ! बिलकुल डेफ अँण्ड डम् !' दैवानं इतराजी केल्यावर श्रद्धाळू मनही देवावर चिडतं, रागावतं, संतापतं. पण ते श्रद्धाळूच राहतं. साळवीचा आवाज रेकॉर्ड करताना, साळवी विचारतो, 'साहेब ! काय म्हणू ?' मोदी म्हणतो, 'अरेऽऽ ! पांडुरंग, पांडुरंग बोलनी !' हा मोदीच्याच श्रद्धाळू मनाच्या प्रश्नोत्तरांचा भाग आहे.

आणि शेवटी येतो मोदी. 'शंकर ! पाटीला पॉलिश चांगला ज्याला हाय !' माणसाचं, त्याच्या उद्योगाचं, व्यवहाराचं नाव कसं निष्कलंक असावं, ही मोदीच्या स्वभावविशेषाची आगळी बाजू. प्रत्येकाची सुखदुःखाची दखल घेत विचारपूस करायची ही हृद्य वाटणारी माणुसकीची जाण. 'घाटपांडे ! अरे आमी नसेल, तवा यू आर इन चार्ज ऑफ एव्हरिथिंग !' 'अरे आमचा वाईफ आमाला फायर नाय करेल. पण ते अशा बघेल...अशा बघेल...हर आइज् स्पीक एव्हरिथिंग.' आपली व्यथा, बायकोची स्थिती सांगताना विव्हल झालेला मोदी थट्टेथट्टेत बोलून जातो आणि हसवताना बोचून घायाळ करतो.

मोदी हा बॉस असून ऑफिसमधल्या कुणालाही त्याची भीती वाटत नाही तर धाक वाटतो. आदर वाटतो, प्रेम वाटतं. ऑफिसमधल्या कामाचा कंटाळा वाटत नाही. इतकंच नाही तर ऑफिसमधलं काम घरी नेऊन नीट पूर्ण करणं हे प्रेमळ कर्तव्य प्रत्येकाला वाटतं. बॉस कसा असावा हे दाखवण्याचा प्रयत्न कदाचित नाट्यकृती निर्माण करणाऱ्या लेखकाचा असेलही, पण इतर पात्रं म्हणजे मोदीच्या स्वभावाच्या नाना छटांची चित्रंच असल्यामुळे लेखकाची ही इच्छा पूर्ण व्हायला साहाय्यच झालं आहे.

ऑफिसमधल्या कामात कुणीही गलथानपणा करीत नाही, हे मोदीला माहीत आहे. पण ऑफिसमधलं वातावरण खेळकर आहे आणि ते तसं राहावं ही त्याची इच्छा आहे. तो त्यात स्वतःला पूर्ण विरवून टाकतो आहे. म्हणूनच सर्वांची तो प्रेमळपणान दखल घेतो आणि आपले सर्व स्वभावविशेषच तो पर्यायानं समाधानी आणि निष्ठावंत ठेवतो. पण ऑफिसचं काम घरी न्यायला तो नाखूष आहे. कारण घरचा मोदी सांसारिक अपूर्णतेनं विव्हल झालेला आहे. पत्नीपासून थोडाही दुरावा त्याला नको आहे. म्हणूनच घाटपांडेच्या रूपानं कर्तव्यतत्पर असणाऱ्या आपल्या मनालाच तो म्हणतो, 'अरेऽऽ ऑफिसचा काम घरला करेल तर तुमची बायडी आमाला फायर करेल ना !' त्याचप्रमाणे तो आपल्या दुसऱ्या ऑफिसर

मित्राला फोन करतो तेव्हा म्हणतो, 'अरेऽऽ तुजा सायेब ऑफिसमंदी आला की घरी बायडीसंगट झोपून रायला ?' यात विकृत चौकशी किंवा टीकेपेक्षा आपण पत्नीबरोबरच्या नर्मसंवादाचा आस्वाद घेऊ शकत नाही, ऑफिसमधे येताना पत्नीची ओढ आपल्याला मागे खेचत नाही, याबद्दल त्याला एक हृद्य आणि नाजूक असूया आहे, त्या ऑफिसर मित्राबद्दल त्याचा तो सौम्य उद्रेक आहे.

ही नाटचकृती मुंबईतल्या एका ऑफिसची कल्पना घेऊन लिहिणं हे अगदी सहजपणे अपरिहार्य होतं. कारण लेखक मुंबईच्या ऑफिसातला आहे. पण म्हणून ही नाट्यकृती ही मुंबईच्या वातावरणाची प्रतिकृती आहे, असं मानणं हे योग्य होणार नाही. त्यातले स्वप्नप्रसंगातले संदर्भ किंवा लोकलबद्दलचे संदर्भ किंवा फूटपाथवरच्या फेरीवाल्याचे संदर्भ हे नाटकाचे फारच दुय्यम भाग झाले. ते विनोदाला किंबहुना मध्यमवर्गाच्या अगतिक जीवनातून निर्माण होणाऱ्या करुणेची धार असलेल्या विनोदाला उपयोगी पडतात, एवढंच. पण सर्वसाधारण 'कॉमन मॅन'च्या व्यथा साकार करणारे संवाद म्हणजे सोनाळकर आणि साळवी यांच्यातले, नाटचकृतीच्या दुसऱ्या भागातले संवाद. ते कोणत्याही गावातल्या कॉमनमॅनच्या व्यथाच मांडतात. किंबहुना मोदीचं श्रद्धाळू आणि स्वप्नरंजनात रंगणारं मन हा मोदीतला सांसारिक सुखाची साधी-सरळ-सुखद पत्नीसहवासाची, नर्म सुसंवादाची आस असणारा कॉमनमॅनच आहे. म्हणूनच साळवी आणि सोनाळकर यांनी मांड-लेल्या कॉमनमॅनच्या अपुऱ्या इच्छा या मोदीच्या अपुऱ्या इच्छांचं प्रतीकच आहेत. म्हणूनच त्यांची प्रकट झालेली व्यथा ही कोणत्याही कॉमनमॅनच्या मनाला भिडणारीच आहे, केवळ मुंबईच्या नव्हे. गैरसमजानं ही मुंबईच्या वातावरणाची नाटचकृती आहे असं मानलं जाऊ नये, असं वाटतं.

नशिबानंच खलनायकी ज्याच्या जीवनात केली आहे, अशा एका सज्जन आणि सद्वृत्त माणसाची ही कुणाही माणसाला भिडावी अशी करुणरम्य पण विनोदाची झालर असलेली, वरवर सुखात्मिका वाटणारी पण खरोखरची दुःखांतिका आहे.

मोदीची कंपनी रेकॉर्डर्स तयार करणारी आहे, हेदेखील अत्यंत सूचक वाटतं. कारण मोदीच्या सांसारिक आयुष्यात जी उणीव आहे, ती हार्दिक आणि भावुक संभाषणाच्या देवाणघेवाणीची. पति-पत्नीच्या नाजूक नात्यातल्या परस्पर जिव्हा-ळ्याला आविष्काराचं स्वरूप देणाऱ्या, परस्पर नाजूक भावप्रकटन करणाऱ्या संभाषणाची मोदीला भूक आहे, कुतुहल आहे, ते त्याच्या जीवनाचं बधीर झालेलं, निर्बल, संवेदनाहीन झालेलं एक अंग आहे. कारण त्याची सुस्वरूप आणि अत्यंत सुस्वभावी प्रेमळ पत्नी ही बहिरी आणि मुकी आहे ती डोळ्यांनीच ऐकते आणि बोलते. म्हणूनच ऐकणाऱ्या आणि बोलणाऱ्या यंत्रांची निर्मिती ही मोदीनं स्वतःच्या व्यथेला दिलेली आविष्काराची वाट आहे. ते त्याच्या व्यथेचं वस्तुनिष्ठ स्वरूप

आहे. (पण तेही मोदीसारखंच एकांगी प्रतिसादाचं प्रतीक, दुर्दैवी अगतिक प्रतीक. रेकॉर्डर जे ऐकणार तेच बोलणार. त्यातून मोदीच्या बोलण्याला संवादाचा प्रतिसाद नाहीच.) म्हणूनच शंकरला तो गाडीतून रेकॉर्डरचं नवं मॉडेल आणायला सांगतो. त्यावेळी म्हणतो, ' माजे कारमंद टेपरेकॉर्डर हाय. ब्रॅन्ड न्यू मॉडेल. ते घेऊनशान ये आणि साला ड्रॉप करेल ना, तो आय वुइल सेंड यूटु अंदमान हां !' ते मॉडेल जर शंकरच्या हातून पडलं तर प्रिय पत्नीला जखम झाल्याचं दुःख मोदीला होणार आहे. आणि म्हणून शंकरला अंदमानची, जिथे ऐकणारा– बोलणारा एकही प्रेमळ साथी मिळणार नाही अशा अंदमानला जाण्याची शिक्षा !

टेपरेकॉर्डरचं नवं मॉडेल तरी कसं ? धिस इज मोदी अँण्ड मोदीज् लेटेस्ट मॉडेल, वुइथ बिल्ट इन मायक्रोफोन. अरे सोनाळकर ! तुज्या ड्रीममंदी बी असा मॉडेल नाय. बट इट हॅज कम् इन रिअॅलिटी. एन्ला सेपरेट मायक्रोफोन नाय पायजे. एव्हरिथिंग इज् बिल्टइन. सेकंडली बिल्ट इन माइक लई सेन्सिटिव्ह हाय.' मोदीला स्वतःच्या सुस्वरूप पत्नीत असलेली उणीव किती जाचते आहे, हे या नव्या मॉडेलवरून प्रकर्षानं जाणवतं. त्याचं या नव्या मॉडेलवर पत्नीवत् प्रेम आहे. आणि त्यात प्रथम शब्द ऐकू जावेत आणि उमटावेत ते 'पांडुरंग ! पांडुरंग !' परमेश्वराच्या स्मरणाचे. जणू काही तो परमेश्वराला आळवतो आहे, 'परमेश्वरा ! सजीव पत्नीलाच तू ही नैसर्गिक विधा का दिली नाहीस ? ती दिली नाहीस म्हणून या निर्जीव विधावरच मला त्यासाठी इतकं प्रेम करावं लागतं आहे, आणि स्त्रीमनाचे अनेक पैलू उसने जमा करून, जणू माझी प्रेमळ पत्नीच त्या संभाषण रूपानं श्रुती आणि उक्तीचं सुख मला देते आहे, असं मानावं लागतं. पण प्रथम भेटीतले, एकांतातले ते हृदयस्पर्शी एकरूपत्वाचे बोल ! ते कधीच मला मिळाले नाहीत, ते या निष्पाप पोरीजवळ मी 'यू शुड ओब्लाइज मी, यू शुड हेल्प मी !' म्हणून मागितले. तिला अस्वस्थ करून. ती मला व्हिलन समजली असेल. पण पोरी, माझ्या मनाची व्यथा तुला कशी सांगू ? आय हॅव नेव्हर मिस् यूज्ड इट ! तुला ते बोल जसेच्या तसे परत देतो. मिसेस् मोदी मला सोडून गेली. माझा जीवनातला रस गेला. पण पोरी, तू जे मानसिक समाधान मला दिलंस, ते उपकार आणखी द्विगुणित कर.

'मिस् धेशपांदे ! लाडू दिला ! आता पेढे कवा देल ?' हे मोदीचे शब्द त्याच्या जीवनातल्या आणखी एका उणीवेची जाण देत, डोळ्यांत भावाश्रू उभे करीत नाट्यकृती समाप्त करतात.

म्हणूनच ही एकाच व्यक्तीची–सज्जनाची–भावनाट्यकृती आहे.

## निर्मिती कल्पना

वरील रसग्रहण या नाट्यकृतीच्या निर्मितीच्या दृष्टीनंच मला भावलं तसं मी केलं. प्रत्येकाला स्वतंत्र प्रज्ञा असते यावर माझा विश्वास आहे.

त्यामुळे हे रसग्रहण आणि निर्मितीकल्पना म्हणजे मी काय केलं याचं प्रकट चिंतन आहे. कुणालाही मार्गदर्शन नव्हे, हे कृपया सर्वांनी लक्षात घ्यावं ही विनंती.

या भावनाटचक्रतीच्या नाजूकपणाला धक्का लागून ती बिघडू नये, फुटू नये, चुरगळू नये म्हणून मी तंत्राचं अवडंबर अगदी कमी ठेवलं आणि आवश्यक तेच वापरलं.

**नेपथ्य**–सरकता, फिरता अशा रंगमंचाचा वापर हेतुपुरस्सर टाळला. कारण तंत्राच्या करामतीपेक्षा नाट्यविषयाकडे, व्यक्तिविशेषांकडे रसिकांचं लक्ष अभिनयाच्या आविष्काराच्या द्वारा जास्त प्रकर्षानं वेधलं जावं, अशी इच्छा!

नेपथ्यात अपरिहार्यतेनं दोन भाग. एक रंगभूमीच्या पुढल्या अर्ध्या भागात उभं केलेलं मोदीच्या कंपनीचं ऑफिस. दुसरा रंगभूमीच्या मागील अर्ध्या भागात साधारण दोन ते अडीच फूट उंचीच्या लेव्हलवर उभी केलेली प्रेसिडेंट हॉटेलमधील खोली. त्यातलाच मधला पुढचा थोडा भाग पहिल्या अंकातल्या साध्या हॉटेलमधल्या नेहमीच्या चहाफराळाच्या छोट्या रूममधल्या प्रवेशासाठी (फ्लॅशबॅक प्रवेशासाठी) वापरलेला. एक छोटं हॉटेलमधलं टेबल आणि दोन खुर्च्या. असं फर्निचर वापरून.

मोदीच्या ऑफिसात प्रवेशद्वार प्रेक्षकांच्या दृष्टीनं उजव्या बाजूला न दिसणारं. उजव्याच बाजूला नऊ इंची लेव्हलवर मोदीची केबिन आणि मागे भिंतीचा तुकडा. केबिनला इतर भिंती नाहीत. फार तर एक दाराची चौकट. टेबल-खुर्ची, फोन, शेल्फ इत्यादी. खुर्चीचं तोंड प्रेक्षकांकडे.

केबिनला लागूनच प्रेक्षकांच्या जवळच्या कडेला घाटपांडेची टेबलखुर्ची. खुर्चीची पाठ केबिनकडे.

घाटपांडेच्या टेबलासमोर ऑफिसच्या दुसऱ्या टोकाला, थोडं तिरपं साळवीचं आणि त्याला लागून तसंच सोनाळकरचं टेबल. ऑफिसच्या मध्यभागी मागच्या लेव्हलच्यापासून थोड्या अंतरावर पुढे ललिताचं टेबल. ऑफिसचं हजेरीबुक घाटपांडेच्या टेबलावर आणि फोन घाटपांडेच्या डाव्या हाताला स्टँडवर अथवा घाटपांडेच्या टेबलावरच.

सोनाळकरच्या डाव्या हाताला लेव्हलला टेकूनच एक लेजरचं शेल्फ. त्या शेल्फच्यामुळे त्याच्या मागे दडलेला लेव्हलवरच्या खोलीतला पलंग अर्धवट जाणवेल इतका दिसावा.

लेव्हलवर प्रेक्षकांच्या उजव्या बाजूला मागे एक पार्टिशन. त्या पुढे सोफासेट आणि प्रशस्त टीपॉय. उजव्या कडेला ड्रेसिंग टेबल. प्रवेशद्वार पार्टिशनच्या मागे उजव्या बाजूला. डाव्या बाजूला मागे बाथरूम. (पलंगाच्या मागच्या कडेपलीकडे.)

नेपथ्यात सूचकतेचा वापर केल्यास जास्त सोयीचं होणार, कारण प्रवेशस्थळ बदलून नव्या स्थळावरचा प्रवेश झटकन सुरू होणं नाट्याविष्काराला गतिमान ठेवण्याच्या दृष्टीनं आवश्यक आहे असं वाटतं.

**प्रकाशयोजना** – या बाबतीतसुद्धा फार खेळ केले नाहीत. ऑफिसमधली प्रकाशयोजना म्हणजे साधा–सरळ किंचित् मंद प्रकाश. जिथे ललिता बसते तिथे जरा जास्त. मोदीच्या केबिनमध्येही मोदी नसताना प्रकाश. तोही त्याच्या खुर्चीवर जास्त प्रकाश. तो नसतानाही त्याचं अस्तित्व जाणवावं इतका तो कर्मचाऱ्यांच्या मनात रुजला आहे, असं जाणवावं यासाठी.

पहिल्या अंकात हॉटेलच्या छोट्या खोलीतला प्रवेश दाखवण्यासाठी केवळ दोन खुर्च्या आणि एक टेबल यावरच प्रकाश. प्रकाशानंच खोलीचा लहानपणा सूचित केलेला. खोलीला फ्लॅपडोअरमधून प्रवेश नुसता जाण्यायेणाऱ्याच्या अभिनयानं सूचित केलेला. हा प्रवेश चालू होतो तेव्हा ऑफिसवरचा प्रकाश काढून घेतलेला. मात्र सिलावटीत ऑफिस जाणवत राहते. हॉटेलच्या खोलीतला प्रवेश किंचित निळसर झाक असलेल्या प्रकाशात. फ्लॅशबॅक सुचविण्यासाठी.

दुसऱ्या अंकात मागच्या भागातला पूर्ण लेव्हलवरचा हॉटेलमधल्या मोठ्या खोलीतला देखावा स्वच्छ प्रकाशानं प्रकाशित करून घेतलेला.

नंतरचा ऑफिसचा प्रवेश नेहमीच्या साध्या प्रकाशात.

ललिताला होणारा भास म्हणजे मोदीबरोबरचा तिचा कल्पित संवाद. हा भास चित्रासारख्या मंद निळसर प्रकाशात. पुन्हा खऱ्या मोदीचा प्रवेश नेहमीच्या प्रकाशात.

मोदीचं शेवटचं रेकॉर्डेड भाषण, प्रत्यक्ष मोदीच्या तोंडून त्याच्या केबिनमध्ये खुर्चीवर बसलेल्या मोदीवर प्रकाश संकेंद्रित करून आणि ऑफिस व ऑफिसातले रेकॉर्डरच्या भोवती जमलेले कर्मचारी परावर्तित प्रकाशात ठेवून जास्त परिणामकारक वाटते. त्यातच ललिताचा गहिवरून आलेला हुंदका मिसळला तर...

**पार्श्वसंगीत** – विशेष आवश्यकता वाटली नाही. हॉटेलमधला रेडिओ, काही गंभीर व नाजूक भावना प्रकटनाच्यावेळी पार्श्वसंगीत उपयोगी पडेल. तेही सतारीचे. नाटयकृतीच भावनाटयकृती असल्यामुळे त्यातल्या हळुवार संवादातच संगीतमयता आहे. शब्दच सुरांचं काम करून मनाला भिडतात. फार तर जरा बदल म्हणून साळवी आणि सोनाळकर लयबद्ध गद्यात्मक पद्यात किंवा पद्यात्मक गद्यात ज्यावेळी कॉमन मॅनच्या व्यथा सांगतात, त्यावेळी विशिष्ट तालवाद्य अत्यंत मर्यादित आवाजात वापरलं तर बरं वाटेल. मोदीच्या शेवटच्या भाषणाचे वेळी सतारीच्या स्वरांचा वापर परिणामकारक वाटेल आणि हळुवार हृदयस्पर्शी नाजूक वातावरणात नाटयकृती समाप्त व्हायला साहाय्य होईल.

**अभिनय**—नॅचरॅलिस्टिक अभिनयाची या नाटचकृतीला आवश्यकता आहे असं वाटतं. थोडीही भडक अभिनयाची छटा नाटचकृतीच्या नाजूक भावनामय विश्वाला तडा देईल. संयमित अभिनय हा या नाटचकृतीतल्या सर्वच प्रसंगांना अटळ आहे. कारण स्थलकालानी ते अटळ केलं आहे. फक्त मोदीचं शेवटचं भाषण हे जास्त भावुक होऊ शकेल. कारण त्यानं एकांतात प्रकट केलेली ती विचार-मालिका आहे. भावनांचा उद्रेकही आहे. एरवी संयमशील, खेळकर, थोडा विचित्र तिरसटही असणारा मोदी, त्या एकांतातल्या होत असणाऱ्या ध्वनिमुद्रणात अपाततः बांध ढासळल्यासारखा, एकदा तरी–कर्मचारी समोर नसताना–मोकळेपणानं मला रडू दे. त्यांचा बॉस वरवर खेळकर असला, शिस्तीला कडक असला, 'ऑफिसमध्ये लोक वार्ता किती करते आणि काम किती करते,' हे रेकॉर्ड करून बघणारा असला, तरी अंतर्यामीचे अश्रू झाकण्यासाठी हे कवच घेतलेला आहे. तो टेपरेकॉर्ड्स् मागतो, हा त्याच्या व्यथेचा, रुदनाचाच एक केविलवाणा प्रकार आहे. तो एकांतात मोकळे-पणानं रडू शकतो, आणि ते तुम्हाला जाणवून देऊ इच्छितो. तोही सांसारिक सुख-दुःख असलेला एक कॉमन मॅनच आहे. हसऱ्या आवरणाखाली कारुण्य झाकून ठेव-णारा. हे मोदीला प्रकट करायची ही एक जागा आहे. म्हणून तो भावुक होऊ शकतो. सामाजिक प्रतिष्ठेचं आवरण झुगारून तो साधासुधा माणूस होऊ शकतो.

कॉमनमॅनच्या व्यथांचं लायबद्ध पद्य सोनाळकर आणि साळवी यांच्या तोंडी एक रंजनमाध्यम म्हणून घातलं. पण ज्या समाजव्यक्तीशी त्या कॉमनमॅनशी जीवन संबंध जोडला गेला आहे, ती समाजव्यक्ती त्याच्या व्यथांच्या बाबतीत बहिरी आणि मुकी आहे, तरी ते सारं तो हसत सहन करतो आहे. मोदीचंच ते प्रतीक आहे. म्हणून रंजक माध्यमातूनही ही मोदीच्या रूपकाची व्यथा जाणवली तर... म्हणून तो एक प्रयत्न.

तर अशी ही निर्मितीकल्पना. केवळ प्रकट चिंतन.

ज्याला ही भावनाटचकृती जशी भावेल तशी आविष्कृत करावी. नवा सुर सापडला तर–आणि तो सापडावा–त्यासारखा दुसरा आनंद नाही–वपुंची वपु मोहरून येईल अशी माझी पहिला दिग्दर्शक म्हणून खात्री आहे.

**भालबा केळकर**

प्रोग्रेसिव्ह ड्रॅमॅटिक असोसिएशन, पुणे या संस्थेने
महात्मा फुले वस्तुसंग्रहालयाच्या सभागृहात (इंटिमेट थिएटरमध्ये)
निमंत्रितांसाठी केलेल्या पहिल्या प्रयोगातील

## श्रेयनामावली

लेखक:—व. पु. काळे

दिग्दर्शक—भालबा केळकर

पात्रपरिचय (प्रवेशानुक्रमे)

शंकर — श्री. पाठक

ललिता — अतुला भाटवडेकर

घाटपांडे — प्रदीप पानसे

सोनाळकर — दिलीप वेंगुर्लेकर

साळवी — किशोर सोमण

सचिन — उमेश खरे

बॉय — अविनाश चांदवणकर

कार्टर — अनिल तरळे

मोदी — भालबा केळकर

प्रकाश — उज्ज्वला केळकर

पार्श्वसंगीत — रवी सरदेसाई

नेपथ्य — दिपू फाटक

रंगमंच व्यवस्था — दिलीप कवडे, अजित सातभाई

निर्मिती — शशिकांत कुलकर्णी, श्रीराम खरे.

# पहिल्या जाहीर प्रयोगातील श्रेयनामावली

लेखक– व. पु. काळे

दिग्दर्शक–भालबा केळकर

पात्रपरिचय

शंकर – श्री. जगताप

ललित – अतुला भाटवडेकर

घाटपांडे – शशिकांत कुलकर्णी

सोनाळकर – भालबा केळकर

साळवी – विश्वास गद्रे

सचिन – दिलीप वेंगुर्लेकर

बॉय –<br>कार्टर– अनिल तरळे

मोदी – श्रीराम खरे

प्रकाश – उज्ज्वला केळकर

पार्श्वसंगीत – रवी सरदेसाई

नेपथ्य – दिपू फाटक

रंगमंच व्यवस्था – दिलीप कवडे, अजित सातभाई

निर्मित – प्रोग्रेसिव्ह ड्रॅमॅटिक असोसिएशन.

☐ ' मोदी ॲण्ड मोदी '
ह्या दोन अंकी नाटकाचे सर्वाधिकार
सौ. वसुंधरा काळे,
११ झपूर्झा, साहित्य सहवास,
वांद्रे ( पू. ), मुंबई–४०००५१
ह्यांच्याकडे आहेत. प्रयोगापूर्वी
लेखी परवानगी घेणे जरुरीचे आहे.
तसे न केल्यास कायदेशीर इलाज
करावा लागेल.
मानधन : प्रत्येक प्रयोगाचे शंभर रुपये.

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
था. क्र. ९६७०२ नों. दि ................
वि. ...नाटक..... क्र. २८/४/८३

मोदी अँड मोदी ऑफिस. टेपरेकॉर्डर्स विकणारी ही एक खाजगी कंपनी. त्याप्रमाणे भिंतीवर कॅलेंडर. स्टेजवर मोदींची केबिन. तिथं टेबलावर फोन आणि अवांतर ऑफिस स्टेशनरी. फिरती खुर्ची. केबिनबाहेर चार मुख्य टेबलं, खुर्च्या, साईड रॅक्स, फायली वगैरे. स्टेजच्या उजव्या बाजूला विंगमध्ये ऑफिसचा अवांतर स्टाफ. डाव्या विंगकडे ऑफिसात येण्याचा दरवाजा. दरवाज्यासमोर मोदींच्या केबिनकडे येणारा पॅसेज.

वेळ सकाळची. शंकर शिपाई स्वत:शी गाणं गुणगुणत साफसफाई करतोय. टेलिफोन वाजतो.

शंकर : (टेलिफोन उचलतो) हॅलो - - मोदी अँड मोदी - - हॅलो - - - (टेलिफोन ठेवतो. कामाला लागतो. परत बेल वाजते.) हॅलो, मोदी अँड मोदी. नाही चष्म्याचं दुकान नाही, टेपरेकॉर्डर्स विकणारी कंपनी ... (फोन ठेवतो. पुन्हा बेल वाजते.) रॉंग नंबर असेल. फोन उचलणार नाही, आधीच सांगतो. (बेल वाजत राहते. कंटाळून उचलतो.) ... मोदी अँड मोदी. हो ... टेपरेकॉर्डींग कंपनी ... हां, आता कसा बरोबर फोन केलात ? म्हणजे काय ? ... दोनदा रॉंग नंबर केलात ना ? काय ... ते तुम्ही नव्हता ... ठीक. मी शंकर ... काय ? कोण शंकर ? भगवान शंकर. कोण काय ? मी इथला शिपाई ... आँ ... ऑफिस सुरू व्हायला अवकाश आहे ... काय ? जरा मोठ्यांदा बोला .. मी कसा आलो कामावर ? दादरपर्यंत पश्चिम रेल्वेनं, नंतर

सेंट्रलनं मशीदपर्यंत, तिथून हार्बरनं व्ही. टी. पर्यंत आणि बोरीबंदरपर्यंत आल्यावर पुढे पळत-पळत. काय ? ऑफिस दहा वाजता सुरू होतं... माझा टाईम साडेनऊचा. कोण ? घाटपांडे ?... ते अकरा वाजता येतात. काय ? लेटमार्क होत नाही का ? ... अहो, हे मोदीशेठचं ऑफिस आहे. कळलं का ?... (फोन ठेवून देतो.) म्हणे लेटमार्क होत नाही का ?... ही काय म्युनिसिपालिटी आहे काय लेटमार्क व्हायला ?

(पुन्हा काम करायला लागतो. ललिता देशपांडे येते. थकून बसते. पर्समधून किल्ल्या काढते. टेबलाचा ड्रॉवर उघडते. त्या आवाजानं शंकरचं लक्ष जातं.)

शंकर : तुम्ही ? एवढ्या रामपाऱ्यात ?

ललिता : रामपाऱ्यात काय ? किती वाजले ?

शंकर : ऑफिस सुरू व्हायला एकोणचाळीस मिनिटं आहेत.

ललिता : असू देत. तुझं काय चाललंय ?

शंकर : नेहमीचंच ! साफसफाई आणि रॉंग नंबरचे फोन घेणं.

ललिता : (उतावीळपणानं) रॉंग नंबरचे फोन ? कुणाचे होते ?

शंकर : आता रॉंग नंबरला नाव कोण विचारतंय हो ?

ललिता : मला एखादा फोन आला होता ?

शंकर : रॉंग नंबरचा फोन तुम्हाला कशाला येईल ?

ललिता : बरं, बरं, राहू दे. माझं एक काम करतोस ?

शंकर : एवढी साफसफाई...

ललिता : तीच जरा बाजूला ठेव.

शंकर : म्हणजे नोकरी गेलीच माझी !

ललिता : नोकरी जायला काय झालं ?

शंकर : आता मोदीशेटचा हिसका तुम्हाला माहीत आहे... बाईसाहेब. आल्याबरोबर दारावरची ' मोदी अँड मोदी ' पाटी बघणार. त्या पाटीत चेहरा नाही दिसला तर हा शंकर ' डॅम फूल '. मग शेट दरवाज्याच्या कड्या बघणार. तिथं डाग दिसला तर शंकर ' बिग फूल '. मग हा छातीवरचा बिल्ला बघणार. तिथं चमक नाही दिसली तर शंकर ' ब्लडी फूल '. घाटपांडेशेट काय म्हणतात माहीत आहे ना ? (ललिता मानेनं नाही म्हणते.) शंकर लकी आहे. रोज फुलांचा वर्षाव. जाऊ दे ! तुमचा काम काय होता ?

ललिता : काही नाही.

शंकर : वा, असं कसं ?

ललिता : तू आता एवढं ऐकवल्यावर काम कसं सांगायचं ?

शंकर : तरी तुमचं काम करायलाच हवं. मोदीशेटच्या मर्जीतली माणसं तुम्ही...

ललिता : शंकर… … …

शंकर : बाई, मी आता खोटं बोलतो काय ? रोज तुम्हाला साहेब विचारतो की नाही… ( नक्कल करीत ) …घेसपांडे, लाडू कवा देल ?

ललिता : ( प्रथम रागावते, मग नक्कल पाहून हसते.) एवढ्यावरून मी मर्जीतली काय ?

शंकर : मग ?

ललिता : मग काही नाही. तू बिग…डॅम…ब्लडी सगळा एकदम आहेस.

शंकर : आता माझं काय चुकला ?

ललिता : साहेब प्रत्येकाची तशी चौकशी करतो ना ?

शंकर : त्याशिवाय ऑफिस सुरूच व्हायचं नाही.

( चालत चालत शंकर प्रवेशद्वाराशी जातो. ) हे इथं साळवीशेट. इथनं सुरुवात, (मोदी प्रमाणे) … .. साळवी बाबा, ए बुढा आदमी, हौ इज युवर डायबेटिस ? आणि साला सोनाळकर, तू तो होपलेस माणस हाय. तू लोन मागितला, तो अमाउण्ट तयार हाय. विसरले काय ? सॉरी बॉस काय ? लई होपलेस ! अरे शंकर, ते जोशी आले काय बघ. तेच्या डोळ्यामंदी काय ज्याला होता. तेन्ला मी दवा दिला होता. आस्क हिम टू रिपोर्ट मी. घाटपांडे तुजा डॉटर कसा हाय ? तेन्ला ॲडमिशन मिळाला, काय ? (शंकरची नक्कल चालू असताना ललिता कावरीबावरी होत जाते. कुठंतरी शून्यात नजर लावून बसते. शंकर शेजारी येतो.) धेसपांडे, ओ घेसपांडे, लाडू कवा देल ?

ललिता : ( तिचा एकदम तोल जातो) …मला काही विचारू नका…मला काही माहीत नाही. देशपांडे संपली. मेली. तिचं लग्न ह्या जन्मी होत नाही· ( टेबलावर डोकं टेकते.… रडायला लागते. शंकर कावराबावरा होतो. कामाला लागतो. टेलिफोन वाजतो शंकर टेलिफोनकडे धावतो. )

शंकर : हॅलो, मोदी ॲण्ड मोदी…एक मिनिट…देशपांडेबाई, फोन…

ललिता : ( सावरते. फोन घेत ) …कुणाचा आहे ?

शंकर : नाव सांगितलं नाही.

ललिता : मी देशपांडे, आं…वुईल यू काइण्डली फोन ॲट एलेव्हन थर्टी ? शुअरली. नो मेन्शन प्लीज. (जाग्यावर जाते. पर्स काढते. ) शंकर, आय ॲम सॉरी !

शंकर : तसं काही नाही बाई !

ललिता : माझं एक काम करतोस ? समोरच्या हॉटेलातून दोघांसाठी कॉफी आणतोस ?

शंकर : आणतो ना ! ( ललिता पैसे देते. ललिता ... दरवाज्यापर्यंत जाते आणि पटकन् टेलिफोनजवळ येते. )

ललिता : हॅलो ... आय वॉंट टू स्पीक टू सचिन घाटे. ( जरा वेळाने ) सचिन ... मी ललिता ... मी ऑफिसातून बोलतेय ... तुला फोन करायचा म्हणून लवकर आले; काय ते पटपट बोलून घे ... इथं आता कुणी नाही. शंकरला कॉफी आणायला पिटाळलाय ... तुला त्याच्याशी काय करायचं आहे ? इथं आता कुणी नाही, म्हणजे कुणी नाही. ( घाटपांडे येतात आणि ललिताला पाहून तिथंच थांबतात. ) मी काहीही सांगू शकत नाही ... त्याला काय करणार ? काल ना ? काल नानांचं जास्त झालं होतं ... काय ? ... तुझा फोन येऊन गेल्यावर घरचा फोन आला ... नेहमीच्या हॉटेलात तीन वेळा फोन केला ... लागला नाही ... खोटं काय ? तुझा विश्वास नसेल तर मी फोन बंद करते . मागील पानावरून पुढे चालू असंच ना ... म्हण तसं ... ते माझ्या हातात नाही ... जाईन तर स्वतःच्या जागेत असंच ना ? ऐकलंय ... भेटल्यावर सांगेन ... काय ... पुन्हा भेटणार नाहीस ? ... मग उडत गेलास ... पुन्हा रडत येऊ नको ... ललिता मेली. ( फोन आपटते. )

घाटपांडे : शब्द हे शस्त्र आहे, जपून वापरा. ( हातातील फाईल ठेवतात. )

ललिता : (लक्ष जाऊन) मला काही म्हणालात ?

घाटपांडे : कोण ? मी ... छे ... ! मी स्वतःशी बोललो, शब्द हे शस्त्र आहे ...

ललिता : जपून वापरा, असंच ना, म्हणजे हे मलाच उद्देशून होतं.

घाटपांडे : तुला उद्देशून कशाला बोलू ? आत्ता येताना टॅक्सीनं आलो, त्या टॅक्सीवर हे वाक्य लिहिलेलं होतं.

ललिता : आणखी काही नव्हतं लिहिलेलं ?

घाटपांडे : होतं ना, हायपोथिकेटेड टू बँक ऑफ बरोडा असंही लिहिलं होतं.

ललिता : आज टॅक्सीनं आलात ?

घाटपांडे : स्टेशनपासून, आणि तेही सिंडीकेटमध्ये.

ललिता : माझं ? फोनवरचं बोलणं ...

घाटपांडे : ऐकलं थोडंसं. बिचारा !

ललिता : कोण बिचारा ?

घाटपांडे : ज्याला कायम ऐकून घ्यावं लागणार आहे तो !

ललिता : बरोबर आहे, तुम्हाला सचिनचीच बाजू पटणार.

घाटपांडे : अच्छा अच्छा ऽऽ! म्हणजे तो सचिन होता तर ! मग बरोबर.

ललिता : काय ? बरोबर काय ?

घाटपांडे : जो ऐकून घेतो, त्याला कायम ऐकावंच लागतं. अशा माणसांना कायम सगळी सुनवीत असतात सगळी ! लांबची आणि जवळचीसुद्धा.

ललिता : तुम्हाला माझी सगळी परिस्थिती माहीत आहे. कधी काही लपवलं तुमच्यापासून !

घाटपांडे : अग पण...

ललिता : मोदीसाहेबांसारखा देवमाणूस आणि तुम्ही, मला भेटला नसतात तर मी एवढी जगलेच नसते.

घाटपांडे : एका माणसावर अन्याय करतेस तू !

ललिता : कोण ?

घाटपांडे : सचिन. त्याचं काय ?

ललिता : तो बिचारा बसलाय माझी वाट पाहत.

घाटपांडे : त्याला किती वर्षं वाट पाहायला लावणार आहेस ?

ललिता : कंाय करूं ? संसार थाटायला जागा नको ? गेली तीन वर्षं, प्रत्येक शनिवार-रविवार आम्ही दोघं फक्त एकच उद्योग करीत आहोत, जागा शोधणं !

घाटपांडे : सचिननं कुठल्याशा सोसायटीत पैसे भरले होते, त्याचं काय झालं ?

ललिता : ते बुडाले असं समजायचं.

घाटपांडे : का बरं ? प्रमोटर पळाला ?

ललिता : त्याच्या तोंडाला फेस आलाय. चारापैकी दोन इमारती झाल्या. उरलेल्या जागेत झोपड्या आहेत. चार हजार रुपये दिल्यावर त्या झोपड्या प्रथम जाणार होत्या. सोसायटी पैसे देते म्हटल्यावर त्यांच्या मागण्या वाढत गेल्या. आता दहा हजार मागतात. सगळं फायनल होईतो पावसाळा येतो. मग चार महिन्यांपुरती ' स्टे ' ऑर्डर येते आणि आता कार्पोरेशनचं इलेक्शन आलं. पुन्हा त्यांना हात लावायचा नाही. इलेक्शन झाल्यावर काय होतं पाहायचं ! हे सगळं होईपर्यंत भाव वाढतात, मध्येच सिमेंट गडप होतं. ह्या चक्रात बिल्डिंग ह्या जन्मी होईल की नाही, सांगता यायचं नाही. तोपर्यंत झोपड्या वाढतात.

घाटपांडे : ह्या देशात पाच मजली इमारत पाडणं सोपं आहे, पण झोपडी हलवणं अशक्य आहे.

ललिता : एकच मार्ग उरलाय. स्वतःच कुठंतरी झोपडी बांधायची आणि राहायचं !
(घाटपांडे जातात.)

(शंकर कॉफी आणतो.)

शंकर : घ्या बाई झटपट ! मला मोकळं करा. अजून बाहेरच्या पाटीला पॉलिश व्हायचंय.

ललिता : तू का आणलीस ?

शंकर : हॉटेलचा पोऱ्या रजेवर आहे.

घाटपांडे : कोण रजेवर आहे ?

(घाटपांडे आतून एक फाईल घेऊन येतात. शंकर त्यांच्याकडे बघतो.)

घाटपांडे : असा बघू नकोस. तुला माझ्यासाठी खेप घालायला लावणार नाही. मला कॉफी नकोय. (ललिता बशी पुढे करते.) मी शंकरसाठी म्हणालो नाही, मला कॉफी खरंच नकोय.

ललिता : घ्या हो एवढी.

(दोघं कॉफी संपवतात. शंकर कप घेऊन जातो.)

घाटपांडे : आता बोल, सचिन काय म्हणतोय् ?

ललिता : तुम्ही पिच्छा पुरवणार तर !

घाटपांडे : पिच्छा असं नाही, पण मघाशी फोनवरचं बोलणं जरा प्रक्षोभक वाटलं, म्हणून ...

ललिता : तुम्ही आजच नेमके लवकर आलात ! का ?

घाटपांडे : काल एक तास लवकर पळालो म्हणून आज एक तास लवकर आलो. कुणी विचारलं तर सांगायला बरं !

ललिता : ह्या ऑफिसात जाण्या-येण्याचा हिशोब कुणी कुणाला विचारलाय का ? केव्हाही या, केव्हाही जा.

घाटपांडे : पण काम करा !

ललिता : सरकारी नोकरीच्या अगदी विरुद्ध.

घाटपांडे : मला काही तो अनुभव नाही.

ललिता : भाग्यवान आहात. मी चारच महिने सरकारी नोकरी केली.

घाटपांडे : कुठे होतीस ?

ललिता : (उभी ओंजळ करीत) योगक्षेम. तिथं एकदा साडेदहाला भोज्या पकडला की संपलं !

घाटपांडे : दॅट इज द ट्रॅजेडी. सरकारी यंत्रणेत समोरच्या प्रत्येक माणसाला 'लबाड' ठरवलं जात. अनलेस ही प्रूव्हज् अदरवाईज. आणि खाजगी कंपनीतून समोरचा माणूस प्रामाणिक आहे, असं गृहित धरतात. तरी वाटतं केव्हा-केव्हा, की कुणीतरी हडसून जाब विचारावा की, 'आज उशीरा का आलात ? ... काल लवकर का पळालात ?'

ललिता : समजा असं विचारलं, तर काय होईल ?

घाटपांडे : म्हणजे आपल्यालाही मोकळेपणी सगळं सांगायची संधी मिळते. मन हलकं होतं. आता आजचंच उदाहरण घ्या.

ललिता : कोणतं ?

घाटपांडे : तुझं टेलिफोनवरचं वरच्या आवाजातलं बोलणं ऐकून मी जर त्याची दखल घेतली नसती तर तुला चाललं असतं ?

ललिता : वरच्या आवाजातलं म्हणजे ... काय झालं सांगते बरं का ! सचिन म्हणतो कसा...

घाटपांडे : विसर जे काय म्हणतो ते...

ललिता : अहो पण, त्याला सगळी परिस्थिती माहीत असूनसुद्धा...

घाटपांडे : ते सगळं सावकाश सांग. अगोदर सचिनला फोन कर, इतर मंडळी यायच्या आत.

ललिता : मी त्याला फोन करणार नाही.

घाटपांडे : का बरं ?

ललिता : फोनवर काय सांगू ?

घाटपांडे : सगळं विसर बोलले ते, एवढंच सांग.

ललिता : मला ते नाही जमायचं.

घाटपांडे : ललिता, ज्याला क्षमा करता येते त्यालाच रागवायचा अधिकार असतो. संसारात हा तोल जपावाच लागतो. एक क्षण भाळण्याचा, बाकी सगळे सांभाळण्याचे. कायम लक्षात ठेव. (फोन वाजतो.) फोन न घेता मी तुला सांगतो, हा फोन सचिनचा आहे. (घाटपांडे उठतात. फोन घेतात.) हॅलो येस्... मोदी अँड मोदी... वन् मिनिट हं... (फोनवर हात ठेवतात.) हां, सचिनला काय सांगूं ?

ललिता : त्याचाच फोन आहे ?

घाटपांडे : मग ? घाटपांड्यांची बत्तीशी नकली असली तरी ! (ललिता उठते. फोन घेते. पण पुन्हा घाटपांड्यांना परत करते.) म्हणजे काय ?

ललिता : त्याला सांगा, मी इथं नाही.

घाटपांडे : कुठे गेली म्हणून विचारलं तर काय सांगू ?

ललिता : सांगा, टॉयलेटला गेलीय.

घाटपांडे : हॅलो...मी घाटपांडे बोलतोय. देशपांडे ना ? (करंगळी वर करून) तिकडे गेल्या आहेत. (देशपांडे हसते...घाटपांडे टेलिफोनवर हात ठेवतात.) हसतेस काय ? त्याला तिकडे ऐकू जाईल ना ?

ललिता : अहो पण तुमची 'ही' खूण त्याला तिकडे दिसणार आहे का ?

घाटपांडे : (जीभ बाहेर काढीत, फोनवर) हां हां, ललिता ना, ती टॉयलेटला गेली

आहे. काय ? ती जिवंत आहे ना ? (फोनवर हात ठेवून हसतात.) मला समजलं नाही... हो हो, आहे जिवंत आहे, .. हो... म्हणूनच जावं लागलं. ओ. के. ! सांगतो, सांगतो. (फोन बंद करतो.) आत्ताची वेळ तर टळली. पुढे काय ?

ललिता : तोच प्रश्न सोडवणं कठीण आहे.

घाटपांडे : सुटेल, सुटेल ! सगळे दिवस सारखे नसतात. परिस्थिती बदलत असते. एव्हरी डॉग हॅज हिज डे असं म्हणतात. आपण तर माणसं आहोत ना ?

ललिता : त्याची पण कधी कधी शंका यायला लागते. मला माझ्याबद्दल काही वाटत नाही, सचिनचीच काळजी वाटते.

घाटपांडे : सचिन ? अच्छा ! अच्छा, म्हणजे मघाशी ज्याला तू 'ललिता मेली' असं प्रेमळपणे म्हणालीस तो...

ललिता : तुम्ही मला आणखीन छळू नका...

घाटपांडे : म्हणूनच आता सांगतो ते ऐक. बरं का, तुम्ही...सरळ लग्न करा. डामडौल नको, ताशे-वाजंत्र्या नकोत, हॉल नको, रिसेप्शन नको. हां, आता माझ्यासारख्या पाच-दहा माणसांना ताजमध्ये म्हण किंवा सेंटॉर म्हण तिथं जेवायला घाला आणि संसाराला लागा.

ललिता : राहू कुठे ?

घाटपांडे : तुझ्या नानांजवळ !

ललिता : सचिन त्या जागेत पाऊल ठेवायचा नाही. म्हणजे तो नानांना आयुष्यभर सांभाळायला तयार आहे, पण त्या जागेत नाही. माझी हरकत नाही, तो ऐकायचा नाही. तो म्हणतो, तुझ्यासाठी काहीही करीन, फक्त एकच गोष्ट करायला लावू नकोस एवढी.

घाटपांडे : नाना काय म्हणतात ?

ललिता : नाना ? काय म्हणणार ? पूर्वी एकेक शब्द तरी बोलायचे आता तेही बंद झालंय. जवळ बसवून घेतात, भरून आलेल्या डोळ्यांनी बघतात. घळाघळा रडतात. थरथरता हात पाठीवरून फिरवतात. शब्द सांगणार नाहीत, एवढा तो स्पर्श सांगतो. इकडे नानांची ही अवस्था, तिकडे सचिन . (तिला हुंदका येतो. फोन वाजतो.)

घाटपांडे : तुला तो फोन आता घ्यायला हवा.

ललिता : कुणाचा असेल ? (डोळे पुसते.)

घाटपांडे : सचिनचा ! बेलच्या आवाजावरून सांगतो. ऊठ. तो फोन घे. तू टॉयलेटला तरी किती वेळा जाणार ?

ललिता : (फोन घेते.) हॅलो.. हो, मी ललिता... मला घाटपांडयांनी सांगितलं...

खरंच टॉयलेटला गेले होते ... घाटपांडे खोटं कशाला सांगतील ? हं बोल ... ठीक आहे ... मी विसरले ... हो हो, तूही विसर ... एवढ्यासाठीच फोन केलास ? ... बरं बाबा ... विसरले ... (फोन बंद करते.) चक्रम आहे पुरता!

घाटपांडे : काय म्हणतो ?

ललिता : तुम्हाला काय सांगू ? लाख माणूस आहे. मघाशी रागावले मी. टाकून बोलले ते मीच. मी त्याची क्षमा मागायची, पण तोच मला सांगत होता. विसर सगळं, त्रास करून घेऊ नकोस.

घाटपांडे : पाह्यलंस ? हाच मोठेपणा तू मिळव, असं मघाशी तुला सांगत होतो ... पण ...

ललिता : कबूल आहे. ह्याचा अर्थ सचिन कधीच रागवत नाही, असं तुम्हाला वाटतं का ? आमच्या ठरलेल्या हॉटेलात यायला त्यानं उशीर केला तर मी गप्प बसायचं. मला उशीर झाला तर काय होतं माहीत आहे ?

**फ्लॅश बॅक**

(एका हॉटेलातील फॅमिली रूम. सचिन एकटा बसलाय्. तो घड्याळाकडे बघतो. बेल वाजवतो. पोऱ्या येतो.)

बॉय : साहेब, लेमन झालं, थम्स अप् झालं, आता लिम्का आणू ?

सचिन : अजून फॅण्टा राहृयलंय्.

बॉय : विसरलोच. फॅण्टा आणतो.

सचिन : थांब जरा. फेमिना घेऊन जा, रसरंग आण. (बॉय फॅण्टा आणि रसरंग आणतो.)

बॉय : (रसरंग उघडतो.) पडद्यावर चुंबन दाखवायला हेमाची तयारी. (अंक आपटतो.) मरा ! (एका दमात फॅण्टा संपवतो. बेल वाजवतो. बॉय येतो.) आता लिम्का आण. नंतर उसाचा रस आण. त्यानंतर नीरा आण. आणि शेवटी शहाळं आण.

बॉय : वाचायला काय आणू ?

सचिन : सगळे अंक संपले असतील तर 'अल्पबचत' आण.
(बॉय जातो. थकलेली ललिता धापा टाकत येते.)

ललिता : सचिन ...

सचिन : (आवाज चढवून) म्हण, आय ॲम एक्स्ट्रीमली सॉरी. पाच चाळीसची गाडी डोळ्यादेखत गेली. नंतरची कॅन्सल झाली. तरी मुद्दाम टॅक्सी करून आले.

ललिता : (सचिनचं बोलणं होईतो पाणी पिते ग्लास खाली ठेवते.) खरंच सांगते, सगळं असंच घडलं तुला सगळं सांगते. मला धाप लागली आहे. थोडा थांब.

सचिन : थोडा कशाला ? आयुष्यभर थांबतो.

ललिता : अरे पण ...

सचिन : तू कशाला प्रत्येक वेळी तेच तेच बोलायचे कष्ट घेतेस ? पहिली दहा मिनिटं आपण टेपच करून ठेवू. एक टेपरेकॉर्डर आणू. तोही तुझ्याच कंपनीत मिळेल. मी टेप ऐकत जाईन, तू विश्रांती घेत जा. धाप लागली म्हणे धाप ...

ललिता : तुला कधीही उशीर होत नाही ना ? अगदी मिनिट टू मिनिट वेळ सांभा-तोस ना ? ... तू सांगशील त्या सगळ्या डिफिकल्टीज खऱ्या, कारण तू पुरुष, मी बाई. तेव्हा मी सांगेन ते सगळं खोटं ...

सचिन : मी ' खोटं ' हा शब्द काढलेला नाही. नेहमी असं कसं होतं एवढाच माझा प्रश्न आहे.

ललिता : जे तुझं होत तेच माझं होतं. तुझ्याप्रमाणेच मीसुद्धा नोकरी करते.

सचिन : तुझ्या नोकरीचा मला रुबाव दाखवू नकोस.

ललिता : मी कधीही रुवाब केला नाही. मला एवढंच सांगायचंय् नोकरी करणाऱ्याला नोकरी करणाऱ्याच्या अडचणी समजायला पाहिजेत.

सचिन : त्या मला समजत नाहीत असंच ना ? थांव, लग्न होऊ दे.

ललिता : म्हणजे काय होईल ?

सचिन : दुसऱ्या दिवसापासून तुझी नोकरी बंद.

ललिता : हे आत्ताचं बोलणं नक्की टेप करायला हवं.

सचिन : मी काय शब्द फिरवणार आहे की काय ?

ललिता : भुळीच नाही. फक्त आठच दिवसांपूर्वी ह्याच केविनमध्ये बसून म्हणाला होतास ...

सचिन : काय म्हणालो ...

ललिता : (नक्कल करीत) लल्या, माझ्या राजा, नव्या फ्लॅटचं कर्ज फिटेपर्यंत तुझ्या सचिनसाठी घर आणि नोकरी सांभाळशील ना ?

सचिन : (चिडतो) तू जास्त रुबाव करू नकोस. समजलं ? एक तर उशीर करायचा ...

बॉय : (दरवाजा लोटून आत येतो.) साहेव लिम्का ! अरे बाई आल्या का ? मग आता लिम्का कॅन्सल ना ? (जातो.)

सचिन : त्या हॉटेलबॉयला पण सगळं पाठ झालय्. (ललिता पार्टीशनला डोकं टेकते.

डोळ्यांत पाणी येतं.) च्यायला, वर रडा ! निम्मं आयुष्य वाट पाहण्यात घालवायचं आणि उरलेलं डोळे पुसण्यात. ह्याला म्हणतात लव्ह मॅरेज ! साली खरोखर झक् मारली.

ललिता : अजून वेळ गेली नाही सचिन. तुला मुलगी मिळेल.

सचिन : डिक्लेअर करायची खोटी आहे, रांग लागेल रांग ! मुलगी मिळेल काय ? मुली मिळतील म्हण. स्वयंवर मांडावं लागेल पुरुष असून ! वधुपरीक्षा, पसंती, देवाणघेवाण, मुहूर्त, मानपान, अक्षता की संसार सुरू ! नो वेस्ट ऑफ टाइम, नो वेटिंग बिझनेस ! (ललिता ताडकन् उठून उभी राहते.) का ?

ललिता : जिवाची लावतोड करीत इथपर्यंत आले ते एवढंच ऐकायला ? जाते आता.

सचिन : कॉफी येईल ती घे आणि चालायला लाग. त्या बॉयसमोर नाटक नको. (बॉय ट्रे ठेवून जातो. ललिता त्या 'ट्रे'कडे नुसती बघत राहते. रेडिओवर लताच्या कोणत्या तरी गाण्यातलं शेवटचं कडवं लागतं. सचिन बेल् वाजवतो. बॉय येतो.) ए, प्लीज जरा रेडियो मोठा कर. (बॉय जातो. आवाज वाढवतो. कडवं संपेपर्यंत सचिनची तंद्री लागते. गाणं संपल्या-बरोबर जाहिरात पण त्याच आवाजात लागते. पुन्हा बेल वाजवतो. बॉय समजून न येता आवाज कमी करतो.) ललिता, लल्या, काहीही म्हण, लग्न झाल्याबरोबर लताची सगळी गाजलेली गाणी घ्यायची. प्रत्येक सकाळ अशा जीवघेण्या स्वरांनी उगवली पाहिजे. सकाळ कशी उगवते ह्याच्यावर सगळा दिवस अवलंबून असतो. तुला काय वाटतं ?

ललिता : (निर्विकारपणे) साखर ?

सचिन : थांब ग ! मी काय सांगतो ते ऐक. बरं का, लल्या ... आपल्या संसारातली सकाळ कशी असेल सांगू ? (कॉफी थांबवून नीरस चेहऱ्यानं बघत राहते.) मस्तपैकी जागरण आणि वगैरे वगैरे करून आपण उशीरा झोपलो आहोत. मग साहजिकच उशीरा जाग येते. मी हात पसरून अंदाज घेतो. तू शेजारी नसतेस. मी डोळे किलकिले करून पाहतो. तर तू पांघरुणाचीसुद्धा घडी केलेली .. नॉयलानच्या जाळीच्या पडद्यातून माझ्या अंगावर ऊन पडलेलं आहे आणि अंगावरच जाळीचा पडदा उमटलाय्. लताचं कोणतं तरी गाणं छळ छळ, छळतंय् तू त्याच वेळी बाथरूममधून मस्त आंघोळ करून बाहेर आली आहेस. आणि ... आणि ... (तिच्याजवळ सरकायला लागतो. ललिता मागे मागे होते. तिचा हात बेलवर पडतो. बेल वाजते. बॉयची 'आलो साहेब' अशी हाक येते. पाठोपाठ बॉय येतो.)

बॉय : साहेब, काय आणू ?

सचिन : काही नको, जरा वेळानं बिल आण. (बॉय जातो.)

ललिता : ह्याला वास्तवता म्हणतात.

सचिन : म्हणजे काय ?

ललिता : घरी अशीच वेळीअवेळी बेल...वाजणार.

सचिन : ते आत्ता सांगायचं काही अडलं होतं ?

ललिता : आणखीन बरंच काही सांगायचं आहे आणि तेही आत्ताच सांगितलेलं बरं.

सचिन : बोला.

ललिता : आजचा हा दिवस शेवटचा.

सचिन : म्हणजे ?

ललिता : इथून पुढे माझी वाट पहायची वेळ येणार नाही.

सचिन : दॅट्स फाईन ! तू बिफोर टाईम येणार ना ? हेच तर माझं सांगणं होतं. अब इस बात पर... (बेल वाजवतो. बॉय येतो.) आणखीन एक मस्त कॉफी...

ललिता : मुळीच नकोय. (बॉय दोघांकडे आळीपाळीनं पाहतो.)

सचिन : तू आण रे, बघतोस काय ?

ललिता : सचिन कॉफी नकोय. (सचिन बॉयला 'आण' अशी खूण करतो ) मी थांबू का जाऊ ? (बॉय जातो.)

सचिन : (जरा वेळ थांबून) तू माझं ऐकत नाहीस. लग्न झाल्यावर अशीच वागणार आहेस ?

ललिता : तो प्रश्न आता उरलेला नाही.

सचिन : असं कसं ?

ललिता : तू माझ्यासाठी थांबू नकोस. तुझ्या शब्द वरच्यावर झेलणारी मुलगी तुला मिळेल. मघाशी तू चेष्टेत म्हणाला असशील पण मी सिरीयसली सांगते. तुझ्यासाठी खरंच रांग लागेल मुलींची. तुझ्या लग्नात माझ्या संपूर्ण पगाराच्या, लताच्या रेकॉर्डस मी तुला प्रेझेण्ट देईन.

सचिन : ए वेडाबाई...

ललिता : ऐकून घे, मध्ये बोलू नकोस. तुझ्या रिसेप्शनला मी येईन ती मात्र नक्की वेळेवर येईन. उशीर करणार नाही. (तिच्या डोळ्यांत पाणी येतं.)

सचिन : वेडाबाई! (तिला जवळ घेतो) डोळे पूस. धापा टाकीत आपण इथं येतो ते काय भांडण्यासाठी की रडण्यासाठी ? (तिचे डोळे पुसतो.)

ललिता तू नेहमीच असं करतोस. प्रथम थप्पड मारायची, नंतर फुंकर घालायची.

सचिन : मी काय उगीच रागावतो ? तुला उशीर झाला की वाट्टेल ते विचार

मनात यायला लागतात. आणि ते सगळे वाईट-वाईट असतात.

ललिता : एकदम मी मेले वगैरे, असंच ना? (तो बोलत नाही.) मला वेडी म्हणतोस, पण तू काय कमी वेडेपणा करतोस ?

सचिन : (तिच्या खांद्यावर डोकं टेकीत) ललू, तुझं काही कमी-जास्त झालं तर, खरंच मी जगू शकणार नाही,

ललिता : अरे पण, मी मध्येच कशाला मरेन ?

सचिन : तू कमालीची धांदरट आहेस. परवा मी फूटपाथवर तुझी वाट पाहत उभा होतो. किती वेड्यासारखा रस्ता क्रॉस केलास ! एकदम पळत सुटतेस. वाघ लागला होता काय मागे ?

ललिता : मागे नव्हता, पुढे उभा होता. तू किती रागावशील ह्या कल्पनेनंच मी पळत सुटले.

सचिन : पुन्हा असं करायचें नाही.

ललिता : रागवणार नाहीस ना ?

सचिन : नाही. उद्या कुठे भेटणार ?

ललिता : उद्या जमायचं नाही.

सचिन : का ?

ललिता : नानांना इंजेक्शन द्यायला डॉक्टर घरी येणार आहेत.

सचिन : मग परवा ?

ललिता : उद्या फोन करीन

सचिन : फोनची भानगड कशाला हवी ?–भेटू या इथंच, ह्याच वेळी. O. K. ?

ललिता : बरं, येईन.

सचिन : चला, मग निघू या.

ललिता : आता नाही निघायचं. आता कॉफी मागव.

सचिन : ऑलराइट. (बेल वाजवतो.)

ललिता : आवाज मोठा करायला सांग. चांगलं गाणं लागलंय.

(बॉय येतो. सचिन ऑर्डर देतो. गाण्याचा आवाज मोठा होतो. फ्लॅशबॅक संपतो.)

शंकरची साफसफाई चालली आहे. एकेक माणसं कामावर यायला लागतात. एकजण येतो. मस्टरवर सही करतो.

पहिला : शंकर, तारीख बदलली नाहीस.

शंकर : बदलतो साहेब.

पहिला : (आतल्या भागात जाता-जाता) सगळी कामं चोख करतोस, तारीख, बदलायला कसं रोज रोज विसरतोस ? आं ... (जातो.)

ललिता : (तो पहिला गेल्यावर)-शंकरराव, बघा. (शंकर मस्टरच्या टेबलापर्यंत जातो आणि तिथलं एक पुस्तक वर करून दाखवतो. ललिता आणि घाटपांडे हसतात.)

पहिला : (परत येतो) माझं पुस्तक... ...

ललिता : रोज कसं विसरता हो ?

पहिला : माणूस आहे, असं व्हायचंच, एवढं हसायला काय झालं त्यात ? (जातो.)

दुसरा : (प्रवेश करतो. सही करतो. जाता-जाता, शंकर, मोदीशेट आल्याबरोबर मला कळव. (जातो. तो जातो न जातो तोच एक बाई येतात. मस्टरवर सही करण्यासाठी पेन शोधायला लागतात. पर्स चाचपतात.)

शंकर . (पुढे धावतो ) पेन हवंय ना ? घ्या. (बाई शंकरचं पेन घेऊन सही करून जातात.)

घाटपांडे . रोज पेन विसरतात ना ? (शंकर हसतो)

ललिता : आठ-आठ आण्यांपासून बॉलपेन्स गल्लोगल्ली मिळतात. माणसं का नाही इतक्या साध्या वस्तू बाळगत ? (सोनाळकर येतात.)

घाटपांडे : या स्वप्नाळकर.

सोनाळकर : (हातातली बॅग टेबलवर ठेवतात.) पांडे, तुम्हाला मी किती वेळा सांगितलं की माझं नाव सोनाळकर आहे...

घाटपांडे : तेव्हा स्वप्नाळकर म्हणू नका. ते जमायचं नाही. काय ललिता...

ललिता : बरोबर ! जोपर्यंत तुम्हाला स्वप्नं पडतात, तोपर्यंत तुम्ही स्वप्नाळकरच.

सोनाळकर : अहो पण...

घाटपांडे : नेहमीचा वाद राहू दे. कालचं स्वप्न सांगा.

सोनाळकर : करा चेष्टा !

घाटपांडे : चेष्टा नाही हो, तुमची स्वप्नं ऐकायला आवडतात. काय देशपांडे

ललिता : हो ना ! कारण ती वास्तवतेपेक्षा फार उंच नसतात. असा हात वर केला तर हाताला येतील इतकी जवळ असतात. (फोन वाजतो. )पाहा, सत्य आहे.

घाटपांडे : शंकरा, फोन घे बाबा.

( शंकर फोन घेतो. सोनाळकरला बोलावतो. )

सोनाळकर : हॅलो, हां, बोलतोय्. सापडलं का ? कुठे होतं ? मग तुला शंभरदा सांगितलं पाहयला. पुन्हा देऊ नकोस. (फोन बंद करतो.) यूसलेस !

घाटपांडे : का बाबा, रामपाऱ्यात कुणावर चिडलास ?

सोनाळकर : शेजाऱ्यांवर !

घाटपांडे : का बुवा ?

सोनाळकर : पिशवी मागून नेतात उसनी आणि परत देत नाहीत. पिशवी ढापण्यासाठी असते असंच कायम धरून चालतात. बायको पण आम्हाला नंबरी मिळाली आहे. आठ बहिणींत नेमकं हे पात्र आमच्या वाटयाला आलं.

ललिता : शेजाऱ्यावरून बायकोवर का घसरलात ?

सोनाळकर : (हिरीरीनं ललिताच्या टेबलापाशी जातात. ) मी आमच्या किट्-किट्ला सांगितलंय्...

ललिता : किट्-किट् कोण ?

सोनाळकर : होय ! सारखी किट्किट् चालते कानाशी म्हणून तेच नाव ठेवलंय. तिला मी शंभरदा सांगितलंय की, रेशनिंग आणल्यावर रेशनकार्ड पिशवीत ठेवत जाऊ नकोस. पण तिची ती सवय जात नाही. काल-पासून कार्ड शोधतोय्. कशाला सापडेल ?

ललिता : का बरं ?

सोनाळकर : कार्ड नेहमीसारखं पिशवीत आणि शेजाऱ्यांनी कार्डासकट पिशवी उसनी नेलेली !

घाटपांडे : जाऊ दे ! शांत व्हा. विसरून जा.

सोनाळकर : म्हणे विसरा. सांगणं सोपं आहे.

ललिता : तुम्ही स्वप्न सांगा, म्हणजे सगळं विसरायला होईल.

सोनाळकर : स्वप्न राहू द्या हो !

ललिता : नाही, सांगाच ! तुमची स्वप्नं ऐकल्यावर वाटतं की जगात गाढ झोपायचा अधिकार फक्त स्वप्नाळकरांनाच आहे.

घाटपांडे : बरोब्बर ! सोनाळकर, तुमच्या त्या एका स्वप्नावर तर माझंही प्रेम बसायला लागलं आहे.

सोनाळकर : ( एकदम मूडमध्ये येतात. ) परवाच पडलं होतं. बरं का...

ललिता : सांगा.

सोनाळकर : मी हा असा स्टेशनात आलो, तर समोर रिकामी गाडी. मी उभाच राहिलो. म्हटलं ही गाडी सर्व्हिस ट्रेन असणार. यार्डात जाणार. तेवढ्यात स्पीकरवर घोषणा (नक्कल) प्लॅटफार्म क्रमांक तीनवर उभी असलेली गाडी डोंबिवलीहून आलेली... बापरे, मग ताडकन् उडी मारली. डोंबिवलीची गाडी रिकामी ? क्या बात है... बसून आलो आरामात.



म. ग्रं. सं. ठाणे, ...
दा. क्र. 98602 नों. दि. 28/7/83
वि. नाटक क्र.

ललिता : प़ाहा आता ! हेच जर तुम्ही ‘ इम्पाला ’ विकत घेतली आणि कामावर आलो, असं स्वप्न सांगितलं असतं तर ते आवडलं नसतं.

सोनाळकर : देशपांडे बाई, एक वेळ माझ्यासारखा माणूस इम्पाला घेईल, पण डोंबिवली लोकल रिकामी येईल हे विसरा.

घाटपांडे : तरी सुद्धा तुमचं हे स्वप्न मला आवडतं. मला असं स्वप्न पडायला हवं.

सोनाळकर : एकच करा घाटपांडे. तुम्हाला असं स्वप्न पडतंय असं वाटलं तर ती कर्जत लोकल करा, डोंबिवली नको.

ललिता : का, असं का ? तुमची मोनॉपोली आहे का ... डोंबिवलीवर ?

सोनाळकर : तसं नाही हो, घाटपांडे हेडक्लार्क आहेत.

घाटपांडे : ते राहू दे. कालचं स्वप्न सांगा.

(शंकरसाठी आतून वेल वाजते. शंकर जातो.)

सोनाळकर : मला आता एकच स्वप्न पडतं. आठवड्यातून कमीत कमी दोन–तीन वेळा पडतं. तुम्हाला माहीत आहे, मला दोन्ही मुलीच आहेत.

ललिता : मग आता मुलगा हवा असेल.

सोनाळकर : मुळीच नाही I am proud of my daughters. ( शंकर येतो. त्याच्या हातात फायलींचा गठ्ठा. तो गठ्ठा तो घाटपांडयांच्या टेवलावर ठेवतो. घाटपांडे त्याला आणखीन एक फाईल देतात. ती फाईल घेऊन शंकर आत जातो.) मुलींच्या लग्नाच्या आमंत्रण-पत्रिकेचा मी ड्राफ्ट लिहितोय आणि किटकिट सांगतेय तिथं ठसठशीत अक्षरात लिहा ...

ललिता : रिसेप्शन ॲट ताज किंवा ओबेराय असंच ?

सोनाळकर : नाही, ती ओळ नाही. ठसठशीत अक्षरात छापायचं ‘ नो प्रेझेण्ट्स प्लीज ’ हे स्वप्न पडलं की ताडकन् जाग येते. झोप येत नाही. वाटतं, मला ... खरोखर ही ओळ छापण्याइतकी ऐपत येईल का ?

घाटपांडे : त्यासाठी ऐपत कशाला हवी ? आहेर घ्यायचा की नाही, हे तुमच्या मनावर आहे.

ललिता : नाहीतर आयडिया करायची. तुमचं मूळ गाव कोणतं ?

सोनाळकर : का ?

ललिता . त्या गावी जाऊन कार्य करायचं. हल्ली पुष्कळ माणसं असं करतात.

घाटपांडे : आणि मुंबईला येऊन परत स्वागतसमारंभ करतात.

सोनाळकर : ते प्रेझेण्ट्ससाठी. मला ते जमायचं नाही. ‘ नो प्रेझेण्टस् प्लीज ही ओळ छापायची ऐपत येणं म्हणजे हुंडा मोजायची ऐपत येणं असं म्हणतो मी ...

ललिता : एवढंच ना, डोण्ट वरी! तुमच्या मुली मोठ्या होईपर्यंत हुंड्याची चाल...

सोनाळकर : मुळीच नाहीशी व्हायची नाही. माणसं चापून सगळं वसूल करतात. हुंडा नको म्हणतात पण दहा तोळे दागिने मागतात. हिशोब तोच. जग पुढे गेलं असेल. पण माणूस तिथेच राह्यलाय. मांडवात दहा मिनिटं चहा उशीरा आला तर कार्यालय सोडणारी माणसं आहेत. कष्ट न करता फळं देणाऱ्या कोणत्याही चालीरीती बंद व्हायच्या नाहीत. जाऊ द्या. दुकान उघडू या. शंकर, कालच्या फायली आण. (साळवी येतात. ते तोंडानं काहीतरी पुटपुटत आहेत. ते टेबलापाशी येतात. जानव्याच्या किल्लीनं ड्रावर उघडतात. तसबीर काढतात. उदबत्ती लावतात. नमस्कार करतात. सगळ्यांना अंगारा लावतात. )

सोनाळकर : साळवी, तुम्हीच ना ?

साळवी : म्हणजे काय ?

सोनाळकर : मला कधीकधी काय वाटतं सांगू ?

साळवी : (शांतपणे) स्वप्नात की जागेपणी ?

सोनाळकर : जागेपणी हो ! वाटतं की तुम्ही हे तुम्हीच आहात का ?

साळवी : समजलो नाही.

सोनाळकर : तुम्हाला सिरिअस डायबेटीस...

साळवी : पुढे ?

सोनाळकर : त्यात तुमचं जपजाप्य, उपवास...

साळवी : पुढे ?

सोनाळकर : एखाद्या दिवशी तुम्हाला बरं नाही म्हणून प्रत्यक्ष पांडुरंग तुमच्या वेषात यायचा.

साळवी : ( कान धरीत ) विठ्ठला, असे श्रम घेऊ नकोस.

सोनाळकर : तुमचं काय तो ऐकतोय् ? त्याला असल्या ट्रिक्स करायला फार आवडतात. तुमचा तो दामाजी...

साळवी : कुठं तो, कुठं मी ?

ललिता : पण साळवी विठ्ठल जर येणारच असेल तर त्यानं 'पे शीट्स' करतात त्या दिवशी यावं.

साळवी : म्हणजे काय होईल ?

ललिता : ज्याला जेवढा पगार हवाय् तेवढा मिळेल. ( मोटारीचा हॉर्न वाजतो. )

साळवी : तुमचा–आमचा विठ्ठल आला.

सोनाळकर : खरोखर पांडुरंग आहे. ( हॉर्न वाजतो. शंकर धावतो. )

मोदी : ( बाहेरून ) लई च्यांगला, शंकर, पाटीला पॉलिश एकदम वेस्ट ज्याला. आज आम्ही तुला लंच देएल. ( शंकर मोदीशेटची ब्रीफ केस आणि फायली आणतो. केबिनमधे ठेवतो. पुन्हा बाहेर जातो. मोदी त्याला मोटारीच्या चाव्या देतो. ) माजे कारमंदी टेपरेकॉर्डर हाय. ब्रॅण्ड न्यू मॉडेल, ते घेऊन-शान ये. आणि साला ड्रॉप करेल, तो आय वुईल सेण्ड यू टू अंदमान, हं. ( शंकर जातो ) मि. सोनाळकर, तू कसा हाय् ?

सोनाळकर : थँक यू सर.

मोदी : अरे कसा हाय ते बोल.

सोनाळकर : आय अॅम ऑलराईट सर,

मोदी : ऑलराईट नाय. तू होपलेस, टोटली होपलेस हाय ! गॉन केस. (सोनाळकर बघत राहतो.) अरे व्हाय आर यू स्टेअरिंग अॅट मी ? तुला ते मेट्रोचा मूव्हीला जायचा तवा मी मॅनेजरला फोन केला. तिकीट ठेवला, तू गेले नाही ... ...

सोनाळकर : साहेब, आय प्लीड गिल्टी–

मोदी : गिल्टी, बिल्टी काय बी नाय, आय वुइल सेण्ड यू टू अंदमान वुइथ शंकर. साळवी, हाऊ इज युवर डायबेटीस ?

साळवी : चांगला आहे साहेब.

मोदी . अरे डायबेटीस चांगला नाय पायजे, तू कसा हाय ?

साळवी : पांडुरंग पांडुरंग ... ...

मोदी : ते पांडुरंग बिलकुल डेफ अॅन्ड डम्ब हाय. तुजेसंगट वार्ता करते काय ? घाटपांडे, हाऊ इज युवर सन् ?

घाटपांडे : ही इज इम्प्रूव्हिंग. नो टेंपरेचर फॉर लास्ट टू डेज्. ('काय जोशी' हाक मारीत आत जातो. शंकर टेपरेकॉर्डर घेऊन येतो. घाटपांड्यांच्या टेबलावर ठेवतो) अरे वा, नवं मॉडेल आलं का ? वा झकास ! जा बाबा, साहेबाच्या टेबलावर ठेव. साहेब सगळ्यांना दाखवेलच. (शंकर मोदींच्या केबिनमध्ये बॉक्स आणतो.)

मोदी : (आतल्या विभागातल्या माणसांची चौकशी करून ललिताकडे बघत-बघत तिच्या टेबलाजवळ येतो.) मिस देशपांडे, लाडू कवा देल ? (ती काही बोलणार तेवढ्यात मोदी केबिनमध्ये परत येतात. पाठोपाठ शंकर येतो.) एक ग्लास पानी शंकर. (फोन फिरवतात.) आय् अॅम मोदी हियर... हां हां गुडमॉर्निंग... तुजा साहेब ऑफिसमंदी आला की घरी बायडीसंगट झोपून राहचला ? ... व्हॉट ? आऊट ऑफ स्टेशन ? कवा येल ? आस्क हिम टू सी मी ... ओ. के !

(टेलिफोन ठेवतात. बेल वाजवतात. शंकरला घाटपांडचांना बोलवायला सांगतात.)

घाटपांडे : (येतात.) येस सर?

मोदी : (गंभीर चेहऱ्यानं) घाटपांडे, तू काल घरी कवा गेला ?

घाटपांडे : साडेचार वाजता.

मोदी : व्हॉट इज द ऑफिस टाइम ?

घाटपांडे : अप टू फाइव्ह थर्टी.

मोदी : देन व्हाय डिड यू लीव्ह अॅट फोर थर्टी ? आमी मिटींगला गेले. व्हेन आय अॅम नॉट हियर, यू आर इन चार्ज ऑफ एव्हरीथिंग. इफ यू रन अवे लाईक धिस व्हॉट अदर्स...

घाटपांडे : पण साहेब...

मोदी : आय वुइल नॉट टॉलरेट धिस. स्टेटमेंट कवा देल ?

घाटपांडे : तयार आहे. (जातात आणि फाईल आणतात.)

मोदी : स्टेटमेंट टाइप केला ! कवा केला ?

घाटपांडे : काल रात्री घरी केलं.

मोदी : ऑफिसचा काम घरला करेल, तर तुमचा वाईफ आमाला फायर करेल.

घाटपांडे : ती फार चांगली आहे.

मोदी : बायडी चांगला असेल, तवा दे डोण्ट लाइक देअर हजबंड वर्किंग अॅट होम. आमचा वाइफ...

घाटपांडे : फायर करतात ?

मोदी : फायर नाय करेल, पण ते असा बघेल... असा बघेल...हर आईज स्पीक एव्हरीथिंग.

घाटपांडे : पण साहेब...

मोदी : बस् बाबा बस् ! माझे बायडीचा लअी वार्ता नको करू. गो अँड वर्क- (घाटपांडे जायला लागतात.) ओ ऽऽ काका, चालले काय ? कम हियर. आमी मगाशी फायर केला, ते मस्करी केला.

घाटपांडे : सर, आय लाइक्ड दॅट, केव्हातरी कुणीतरी विचारलं पाह्यजे.

मोदी : दॅट वॉज द एक्झॅक्ट रिझन. साला मी फायर नाय करेल, तो नोबडी वुइल कॉल मी बॉस ! जा-जा, काम कर.

घाटपांडे : साहेब, एक सांगायचं होतं...

मोदी : गो ऑन !

घाटपांडे : देशपांडे...

मोदी : ते तो लई होपलेस हाय. लाडू मागते तो...

घाटपांडे : तेच सांगायचं होतं. तिच्याकडे तुम्ही लाडू मागू नका. तिला त्रास होतो.

मोदी : ते शादी नाय करेल काय ?

घाटपांडे : लग्न ठरलंय पण जागा नाही राहायला.

मोदी : तेचा फादर काय करते ?

घाटपांडे : ही इज डाऊन वुईथ पॅरॅलिसिस.

मोदी : (विचारात पडून, जरा वेळानं)यू सेण्ड हर. आय वुईल टॉक टू हर ! (घाटपांडे जातात. ललिता येते. डिक्टेशनची तयारी करून बसते.) धिस इज टू इन्फर्म यू...

ललिता : सर, अॅड्रेस्ड टू ?

मोदी : हां हां, बोलते, बोलते. धीस इज टू इन्फर्म यू अवाउट ए यंग, स्मार्ट, ब्यूटीफूल गर्ल-(ललिता थांबते.) काय ज्याला ? (ती नकारार्थी मान हलवते.) ब्युटिफूल गर्ल, हू इज ड्यू फॉर मॅरेज...

ललिता : साहेब...

मोदी : लाडू कवा देल ? (ती नुसती उभी राहते.) देशपांडे, जरा वार्ता कर. व्हॉट इज युवर डिफीकल्टी ?

लनिता : तसं काही नाही.

मोदी : हाऊ इज युवर फादर ?

ललिता : सर, पॅरॅलिसिस...

मोदी : येस, आय कॅन अंडरस्टॅण्ड. तेन्ला अॅटॅक कवा आला ?

ललिता : अॅट हिज एज ऑफ थर्टीफाइव्ह.

मोदी : ओह, व्हेरी ट्रॅजिक. वॉज ही सिक बिफोर दॅट ?

ललिता : पेनिसिलीन अॅलर्जी. इंजक्शन घेतलं आणि अन्कॉन्शस झाले.

मोदी · (जरा वेळानं) तुजा बॉय फ्रेण्डचा नाव काय ?

ललिता : सचिन घाटे.

मोदी · ते काय करते ?

ललिता : बी. कॉम. आहे. बँकेत सर्व्हिस आहे. त्याशिवाय पार्टटाइम जॉब करतो.

मोदी . जॉब हाय, पार्ट टाइम बी काम करते, मग तुला कवा भेटते ? (ती लाजते.) लुक, मिस धेशपांडे, यू आर यंग. यू शुड गेट मॅरीड एनी हाऊ.

ललिता : जागा मिळाली म्हणजे...

मोदी ते कवा भेटेल ? तू तो वुढी होऊनशान जाएल.

ललिता : नाही साहेब. माझ्या वडिलांची प्रॉपर्टी आहे पनवेलला. ती विकली म्हणजे....

मोदी : किती प्राईस हाय...

ललिता : वडील म्हणतात, चाळीस हजार मिळाले तरी चालतील.

मोदी : (विचार करतो) जा, जा, काम कर. माजा मगस खाऊ नको. धिस इज मोदी अॅण्ड मोदीज ऑफीस. ए काय मॅरेज ब्युरो हाय काय ? जा काम कर.

(ललिता जाते. घाटपांडे येतात.)

घाटपांडे : सर–

मोदी : (बॉक्स उघडीत) यू हॅव कम, दॅटस् फाईन. आय वॉज अबाऊट टू कॉल यू.

घाटपांडे : साहेब, लॅमिग्टन रोडला मॉडर्न वर्ल्ड शॉप आहे....

मोदी : येस, यू राइट टू हिम दॅट वुई आर इंट्रोडयूसिंग न्यू पीस इन द मार्केट...

घाटपांडे : ओ. के. सर. (जायला लागतात.)

मोदी : ओ काका, वेट हिअर. माय वर्क इज नॉट ओव्हर.

घाटपांगे : सॉरी सर.

मोदी : यू नो, ते घेसपांडे हाय, तेन्चा फादरचा पनवेलमंदी प्रॉपर्टी हाय...

घाटपांडे : आय हॅव सीन दॅट प्रॉपर्टी.

मोदी : व्हेकंट प्लॉट हाय ?

घाटपांडे : व्हेकंट प्लॉट पण आहे आणि छोटं घर पण आहे.

मोदी : तू मला कवा पन बोलले नाय ...

घाटपांडे : सॉरी सर...

मोदी : तुला हेड नाय. हेडक्लार्क कोणी केला ?

घाटपांडे : तुम्हीच साहेब.

मोदी : धिस सण्डे वुई वुइल गो टू पनवेल.

घाटपांडे : ओ. के सर.

मोदी : व्हॉट ओ. के. ? कशाला ज्याएल? (घाटपांडे बघतात) ...मोदी अँड मोदी वुइल परचेस दॅट प्रॉपर्टी. आमी ते बंगलेमंदी गोडाऊन करेल. वुई कॅन यूज इट फॉर रॉ स्टॉक. यू अॅरेंज फॉर द ट्रॅन्स्पोर्ट. घेसपांडेला बोल...अँड आस्क हर टू इन्व्हाइट दॅट चॅप. तेचा नाव काय...शी टोल्ड मी जस्ट नाऊ...

घाटपांडे : सचिन...

मोदी : हां, तेला बी इन्व्हाइटीशन देल...

घाटपांडे : येस सर !

मोदी : आणि ते पांडुरंग–पांडुरंगाला बी वाईफ संगट, आस्क हिम टू जॉईन. तेचा वाईफ, शी हॅज अ गुड व्हॉइस.

घाटपांडे : साहेब, मिसेस् मोदी...

मोदी : नो, नो, शी वोण्ट कम. ते काय माजा मॅरेज अॅनिव्हर्सरी हाय काय ?यू गो

(घाटपांडे जातात. तेवढ्यात सोनाळकर येतात.)

सोनाळकर : सर...

मोदी : बोल बोल !

सोनाळकर : सर, लेटेस्ट मॉडेल...

मोदी : ओ, आय टोटली फरगॉट इट. (बेल वाजवतो. शंकर येतो.) घाटपांडे, जोशी, धेसपांडे ते पांडुरंगबाबा, कॉल एव्हरीबडी. (सगळे येईपर्यंत टेप-रेकॉर्डर तयार ठेवतो. सोनाळकर मदत करतात. वायर जोडणं वगैरे.) धिस् इज मोदी अँड मोदीज् लेटेस्ट मॉडेल वुइथ् बिल्ट इन मायक्रोफोन.

सोनाळकर : साहेब म्हणजे...

मोदी : यू सी धिस्. तुजा ड्रीममंदी बी असा मॉडेल नाय, बट इट हॅज कम इन रिॲलिटी. एन्ला सेपरेट मायक्रोफोन नाय पायजे. एव्हरीथिंग इज बिल्ट–इन ! सेकंडली, बिल्ट इन माईक लई सेन्स्टिटिव्ह हाय. साळवीबाबा, यू गो देअर इन दॅट कॉर्नर. (साळवी जातात.) आता काय बी वार्ता कर.

साळवी : काय बोलू ?

मोदी : पांडुरंग–पांडुरंग बोल नी !

सोनाळकर : बोला ना...!

साळवी : पांडुरंग पांडुरंग.

मोदी : नाऊ लिसन् (रिवाईण्ड करतात. धिस इज मोदी अँड...इथपासून सगळं ऐकवतात.)

सोनाळकर : फॅन्टॅस्टिक.

साळवी : व्हेरी सेन्सिटिव्ह.

मोदी : आता आमी आ मशीन कंटिन्यूअसली रन् करेल. समदा स्टाफ काय वार्ता करते आणि वर्क किती करते...आय वुइल नो एव्हरीथिंग.

फेड आऊट...

(हातात चुडा घातलेली ललिता खाली मान घालून बसली आहे. समोर मोदी.)

मोदी : तुमी तो कमाल करते. व्हॉट मेक्स यू क्राय ?

ललिता : सर, यू हॅव...

मोदी : ऑब्लीगेशनचा वार्ता करेल, तो आय वुईल डिसमिस यू !

ललिता : साहेब, तुम्ही देवासारखे...

मोदी : नाय बाबा, आमी गॉड नाय. आमी ह्यूमन बिइंग हाय. जस्ट लाइक यू.

ललिता : असं कसं म्हणता...तुमच्यामुळे...

मोदी : आमी तो एकदम सेलफिश हाय्. मोदी अँड मोदी कंपनीचा प्रॉफिट हाय तवा आमी तुमचा प्रापर्टी घेतला. नाऊ गो, बी हॅपी ! डोण्ट वेस्ट माय

टाइम. (ललिता खाली वाकून नमस्कार करते. जायला लागते.) ए होपलेस गर्ल, जाते काय ? वेट, डोण्ट गो. (बेल वाजवतो. शंकर येतो.) अरे बाबा बाईचा प्रेझेण्ट कुठं हाय ? (शंकर बॉक्स आणतो.) चल्, कम ऑन !

ललिता : साहेब, हे काय ?

मोदी : आमी तेन्ला शादीचा काय बी दिला नाय ...टेक धिस. टेपरेकॉर्डर हाय. लेटेस्ट मॉडेल. बिल्ट इन मायक्रोफोन ! रूममंदी ठेवेल तो समदा रेकॉर्ड ...

ललिता : सर धिस इज टू मच !

मोदी : टू मच हाय असा मी पण बोलला, पण आमचा बायडी ऐकेल नाय. मिसेस् मोदीनं दिला हाय.

ललिता : आय काण्ट ॲक्सेप्ट धिस. मिसेस मोदी लग्नाला आल्या नाहीत....

मोदी : शी इज् व्हिम्सीकल. आऊट हाय. मी थोडा आअुट हाय. मिसेस् मोदी टू मच आऊट हाय. टेक टेक

ललिता : (प्रेझेण्ट घेत) साहेब तुमचे उपकार कसे फेडायचे ?

मोदी : (विचार करीत)—आय वुइल टेल यू.

ललिता : खरच सांगा. मी काहीही करीन.

मोदी : तुमाला आमच्या हेल्पचा बर्डन झाला काय ?

ललिता : खरंच बर्डन वाटतं.

मोदी : मंग तुमी एक फेव्हर करेल काय ?

ललिता : प्लीज डोण्ट कॉल इट अ फेव्हर.

मोदी : आमी सांगेल ते करेल ? (ती 'हो' म्हणते.) मागेल ते देईल ? (ती हो म्हणते.) यू शुड नॉट बॅक आअूट !

ललिता : तुम्ही फक्त सांगा

मोदी : (केबिनमध्ये फेऱ्या मारतात. ललिता पाहत राहते. मोदी केबिनचं दार उघडतात. शंकर धावत येतो.) शंकर. कोनला आतमंदी सोरू नको. (तो मान हलवतो. मोदींच्या येरझारा. ललिता पाहत राहते. मोदी तिच्या जवळ येतात.)—यु वूइल नॉट बॅक आअूट ? (ती मानेनं नाही म्हणते. एक पाऊल मागे सरकते. मोदी पुढे येतात.)

ललिता : सर, तुम्हाला काय हवंय ?

मोदी : आय वुइल टेल यू. बिलकुल कॉन्फिडेन्शियल हाय. तू देल तो तुजा लॉस काय बी नाय. माझा प्रॉफीट हाय.

ललिता : साहेब...

मोदी : तू तो आता ते सचिनसंगट हनीमूनला ज्याएल ना ? (ती लाजते.)—तवा आमचा एक काम हाय. सचिनला वार्ता नाय करेल असा काम हाय.

ललिता : म्हणजे साहेब...

मोदी : नाऊ लिसन ! आमी तेन्ला टेपरेकॉर्डर दिला हाय. तवा तुमचे पहिली रात होअेल ना, युवर फर्स्ट नाइट... (ललिता खुर्चीचा आधार घेते.) तवा, तुमचे हजबंडसंगट जे वार्ता होएल... जे रोमान्सचा वार्ता होएल... तेचा मला रेकॉर्डिंग ..यस...आय वाँट दॅट टेप. तुमचे हजबंड-वाईफचा डायलॉग... (ललिता खुर्चीत कोसळते. तोंड लपवते. मोदी वाकून सांगत राहतो.) फर्स्ट नाइटचा वार्ता...तुमचे रोमान्सचा रेकॉर्डिंग. घेसपांडे यू कॅन हेल्प मी... (अंधार होत जातो. मोदींचा आवाज वाढत जातो.)यू कॅन ओब्लाइज मी घेसपांडे. आय वॉण्ट युवर डॉयलॉग !

प्रेसिडेंट हॉटेल. अनेक खोल्यांपैकी एक खोली. खोलीत येण्याचा दरवाजा प्रेक्षकांच्या उजव्या हाताला. डाव्या बाजूला एक मोठी खिडकी. त्याला लागून बाल्कनीत जाण्याचा दरवाजा. समोर टॉयलेटचा दरवाजा. एक डबल बेड, एक ड्रेसिंग टेबल. आरामखुर्ची, वॉर्डरोब वगैरे. खोलीचा दरवाजा उघडून हॉटेल बॉय कार्टर येतो. पाठोपाठ सूटकेससहित सचिन आणि त्याच्या मागे ललिता.

कार्टर : या सचिनशेट, या-या वहिनी ! (कार्टर बाल्कनीची खिडकी उघडतो. दरवाजा उघडतो.) या, सचिनशेट तुम्ही इथं मस्त आराम करा. (खुर्ची सरकवतो. सचिन बसतो.) वहिनीबाय, तुम्ही जागा बघून घ्या. सचिनशेटना आराम करू दे.

सचिन : तुला माझं नाव कसं समजलं रे ?

कार्टर : आता रजिस्टरमधे लिहिलं...

सचिन : इंग्रजी येतं वाटतं ?

कार्टर : साहेब मला चार भाषा येतात. येस, फोर लँग्वेजेस्.

सचिन : अरे वा, नवल आहे. तुझं नाव...?

कार्टर : कार्टर.

सचिन : कार्टर ? म्हणजे अमेरिकेचा...

कार्टर : आमचाच जातवाला.

सचिन : भले...

कार्टर : त्याचं असं आहे साहेब, हॉटेलचं नाव प्रेसिडेंट. मग म्हटलं आपलं नाव कार्टर. इथं पट्टीवर लिहायला बरं नाही का ? (छाती पुढे करतो.) प्रेसिडेंट कार्टर...

ललिता : (इतका वेळ ती आरशासमोर स्वत:मध्येच दंग आहे) आणि अमेरिकेचे प्रेसिडेंट बदलले म्हणजे...

कार्टर : म्हणजे फक्त ह्या टेपचा खर्च करावा लागतो. पहिलं प्रेसिडेंट तसंच ठेवायचं, पुढचं नाव बदलायचं. केनेडी, जॉन्सन...

ललिता : समजलं. सध्या तू कार्टर...

कार्टर : राजीनामा देईपर्यंत.

सचिन : तू राजीनामा देणार ?

कार्टर : मी नाही हो, आमचा अमेरिकेतला जातवाला, त्यानं राजीनामा दिला...

सचिन : म्हणजे मग तू राजीनामा देणार...

कार्टर : नाही हो साहेब...

सचिन : बरं कार्टरसाहेब, तुमच्या ह्या हॉटेलात एकूण किती पाहुणे असतात ?

कार्टर : छत्तीस खोल्या

सचिन : म्हणजे बहात्तर माणसं...

कार्टर : जोडीनं आली तर...

सचिन : हनीमूनला कोणी एकटाच येतो का रे ?

कार्टर : साहेब, पण सगळे हनीमूनला येतात असं कुठं म्हणालो मी !

ललिता : तुला काय हवंय ?

सचिन : कार्टरसाहेबांना आणखीन किती खोल्यांकडे लक्ष द्यावं लागतं एवढंच हवं होतं.

कार्टर : (लक्षात येऊन) निघालोच साहेब. (जातो.)
(कार्टर गेल्यावर सचिन उठतो. दरवाजाला आतून कडी लावून घेतो ललिताला जवळ घेतो.)

ललिता : अरे, थांब थांब ! मला वॉश तरी घेऊ दे !

सचिन : नॉट नेसेसरी !

ललिता : माझा अवतार पाहिलास का ?

सचिन : ह्याच अवतारात छान दिसतेस. मोस्ट नॅचरल !

ललिता : अरे पण...

सचिन : (तिला आरशासमोर आणतो.) पाहा, नीट पाहा. माझ्यापेक्षा त्या आरशावर जास्त विश्वास आहे ना ? सांग आता. काय वाईट दिसतेस ?

ललिता : अरे पण, मी आता तुझीच नाही का ? थोडा धीर धर. एका मिनिटात तोंड धुऊन येते.

सचिन : नो प्लीज, तू वेळ लावणार.

ललिता : तू बघच. मी किती झटपट येते ते. बाय वॉच, एका मिनिटात...

सचिन : अग पण एका मिनिटात तोंड धुवायचं असेल तर ते धुवायचंच कशाला ?

ललिता : (सचिनला लोटत-लोटत आरामखुर्चीपाशी नेते. त्याला खुर्चीत जवळपास ढकलते.) तुम्हाला प्रेसिडेंट कार्टरनं काय सांगितलंय ?

सचिन : काय ?

ललिता : तुम्हाला त्यानं मस्तपैकी आराम करायला सांगितलं आहे. तेव्हा आराम करा.

सचिन : हे पहा लल्या...

ललिता : बोलायचं नाही. कार्टरचं ऐकायला हवं. नाहीतर अमेरिकेचे आणि भारताचे संबंध बिघडतील. मी आलेच.

(टॉयलेटला जाते. तिथूनच 'अय्या' म्हणून ओरडते. सचिन 'काय झालं ग ?' म्हणत उभा राहतो. तोपर्यंत ललिता बाहेर येते.)

सचिन : काय झालं ?

ललिता : (बाहेर येत) एवढी झकास टाइल्स लावलेली बाथरूम, पण...

सचिन : टब बाथची सोय नाही ना ?

ललिता : तोही आहे.

सचिन : मग ओरडलीस का ? झुरळ को उंदीर...

ललिता . वॉश बेसिनला नळच नाही.

सचिन : (डोकावून पाहून येतो.) च्यायला ! हॉटेल आहे की चेष्टा आहे ?

ललिता : वॉश कसा घ्यायचा ?

सचिन : वॉश बेसीनच्या खाली आणखी एक टॅप असते.

ललिता : पण एवढे पैसे मोजल्यावर सगळ्या सोयी का नसाव्यात ?

सचिन : जाऊ दे ग ! मी तुला मघाशीच म्हणालो, तू अशीच छान दिसतेस...

(ललिता न बोलता दार उघडते. कार्टर, कार्टर म्हणून हाका मारते. सचिन तिला धरून खोलीत आणतो.) वेडाबाई, स्टेशनवर हमालाला हाका मारतात तसं करायचं नसतं (तिला एक बटण दाखवतो.) हे दाब. (ताबडतोब दरवाज्यात कार्टर येऊन उभा. राहतो.) बघ, बेल वाजल्याबरोबर आला की नाही.

कार्टर . साहेब, ती बेल चालत नाही.

सचिन : मग आलास कसा ?

कार्टर : बाईसाहेबांची हाक ऐकून आलो. (सचिन कपाळावर हात मारून घेतो.) आणि साहेब तुम्ही हाक मारली नसती, तरी मी येणारच होतो. बाथरूम-मधे नळ बसवायचाय् ? (बाथरूमकडे जायला निघतो.)

सचिन : हा काय चावटपणा आहे रे ?

कार्टर : (थांबून) चावटपणा ? सचिनशेट, हलकटपणा म्हणा. मागच्या आठव-ड्यात एका सिंधी जोडण्याला हीच खोली दिली होती त्यांचे प्रताप !

ललिता : अरे, पण, पाहुण्यांनी खोली सोडण्यापूर्वी तुम्ही चेक् करताना ?

कार्टर : चादरी, उशा, टॉवेल्स आहेत ना, एवढं बघतो. आता कुणी नळच पळवेल, असा डाऊट येईल का ?

सचिन : आता फक्त किती वेळ लागेल, एवढंच सांग.

कार्टर : दोन मिनिटांचं काम. (टॉयलेटमध्ये जातो. ललिता बॅग उघडते. सचिनला त्याचे कपडे काढून देते. सचिन गॅलरीत जाऊन येतो. आणि खोलीतील बटणं, दिवे इ. गोष्टी चेक् करतो. खोलीतले, गॅलरीतले, आलटून-पालटून एकेक दिवे लागतात-विझतात.)

ललिता : काय करतोस ?

सचिन : काय काय चांगल्या कंडीशनमधे आहे ते पाहतो. बेल् वाजत नाहीच आहे. (तेवढ्यात कार्टर येतो.) आणखीन काय काय रजेवर गेलंय ते...

कार्टर : साहेब, बेलचं मी बघतो.(वाजवून बघतो.)थांबा हं. (पुन्हा बटन दाबतो. बेल वाजते.) साहेब, बेल चालू आहे.

सचिन : (पुढे येतो,) मग मघाशी का नाही वाजली ? (वाजवून पाहतो. वाजत नाही.) पाहयलंस ?

कार्टर : (पुढे होतो. वाजवतो. बेल वाजते.) बघा. दाबण्यात जरा ट्रिक आहे. पण पण जमेल. तुम्ही नवीन आहात ना.. (सचिन पाहतो.) ह्या हॉटेलात...

ललिता : त्यापेक्षा आम्हाला दुसरी खोली दे.

कार्टर : वहिनीबाई, हीच खोली बेस्ट आहे. माझं ऐका. खोली बदलू नका.

सचिन : का पण ?

कार्टर : ते आता बाईमाणसासमोर सांगायचं म्हणजे... (ललिता टॉवेल घेऊन आत जाते.)

सचिन : सांग आता.

कार्टर : साहेब, ही खोली एकदम लकी आहे. राजेश खन्ना ह्याच खोलीत...

सचिन : काय सांगतोस काय ? ह्या खोलीत ?

कार्टर : होय साहेब. त्याशिवाय साहेब, माझाही अनुभव चांगला आहे.

सचिन : म्हणजे तू...

कार्टर : होय साहेब, माझ्या लग्नानंतर मी ह्याच खोलीत राहचलो होतो.

सचिन : अरे पण...

कार्टर : साहेब, तसं देवानं आपल्याला भरपूर दिलंय्. अठ्ठेचाळीस एकर जमीन आहे.

सचिन : सिम्पली ग्रेट ! काय पिकवतोस ?

कार्टर : ऊस.

सचिन : अरे मग शेती का करीत नाहीस ?

कार्टर : आपलं लाइफ शहरात गेलं साहेब. दोन वर्षं कॉलेज झालं. शेतीत जीव लागत नाही.

सचिन : पण मग असली नोकरी का करतोस ? मस्तपैकी सचिवालयात जॉब करा-यचा. ऊसवाल्याला काय तोटा ?

कार्टर : बाप सांगत होता.

सचिन : बापही शेती करतो का ?

कार्टर : बाप आमदार आहे.

सचिन : (ताडकन उठतो.) तुला नमस्कार करून ठेवलेला बरा !

कार्टर : साहेब...

सचिन : अमेरिकेचा होशील की नाही माहीत नाही, पण भारताचा प्रेसिडेंट झालास तर घ्या काय ?

कार्टर : साहेब, गरीबाची चेष्टा करताय काय...?

सचिन : 'गरीबाची' हा शब्द उच्चारायचा नाही. मला तर कार्टरशेट, निराळीच शंका येतेय्... ...

कार्टर : काय झालं साहेब... ... ...

सचिन : हे हॉटेलही तुमचंच असेल. ( कार्टर गप्प. ) राहतोस कुठे ?

कार्टर : मागच्या अंगाला; ग्राऊंड फ्लोअरला.

सचिन : कोण कोण राहता ?

कार्टर : मी , मिसेस् कार्टर आणि दोन युवराज !

सचिन : दोन्ही मुलगे का ! वा... ... !

कार्टर : जुळे !

सचिन : काय सांगतोस काय ?

कार्टर : साहेब, ह्याच खोलीचा गुण. (सचिन बघत राहतो. कार्टर सलाम करतो.)

सचिन : (खूण करून जवळ बोलावतो.) कार्टरसाहेब, आमचं एक खाजगी काम करणार का ?

कार्टर : सांगा ना साहेब.

सचिन : गुपचुप करायचं.

कार्टर : (विचार करीत) साहेब, फक्त ब्रँड सांगा.

सचिन : यू आर सिम्पली ग्रेट. (जवळ बोलावून कानात सांगतो. कार्टर मान हलवीत जातो. ललिता टॉयलेटमधून येते. ) मार्व्हलस !

ललिता : काय ? मार्व्हलस काय ?

सचिन : जगातलं सर्वात मोठं काव्य कोणतं माहीत आहे ?

ललिता : कोणत्या भाषेतलं !

सचिन : बिनभाषेपासून चौदा भाषांपर्यंत, माहीत आहे ? (नाही म्हणते.) बाथरूम-मधून बाहेर येणारी स्त्री, हे…… शाकुंतलाहून महान् काव्य आहे. बिचारा गटे……

ललिता : ( आरशासमोर जात ) …हा मधेच गटे कोण ?

सचिन : फ्रेंच का ऑस्ट्रिलियन कवी होता म्हणे ! तुला माहीत आहे ? ( नाही म्हणते.) मग जर्मनसुद्धा असेल.

ललिता : त्याचं काय ?

सचिन : कालिदासाचं शाकुंतल म्हणे तो डोक्यावर घेऊन नाचला होता.

ललिता : मग त्या बिचाऱ्याचं काय ?

सचिन : वॉश घेऊन येणारी स्त्री, ही शाकुंतलाहून श्रेष्ठ कलाकृती आहे हे जर त्याला समजलं असतं.

ललिता : तर आंघोळीहून आलेल्या बाईला तो डोक्यावर घेऊन नाचला असता, असंच ना ?

सचिन : वाय् ऑल मीन्स ! जाऊ दे. ( जवळ जाऊ लागतो. ) गटेची ती चूक सचिन घाटे दुरुस्त करणार आहे. गटे काय, घाटे काय……

ललिता : प्रथम तू वॉश घेऊन ये, फ्रेश वाटेल.

सचिन : आय ॲम् बॉर्न फ्रेश. (जवळ जातो.) आहाहाहा, साबणाचा किती प्रसन्न सुगंध हा……

ललिता : ( सुटका करून घेते. सचिनच्या अंगावर टॉवेल टाकते. त्याला टॉयलेट-मध्ये जवळजवळ ढकलते. दार ओढून घेते. ) गडबड केलीत तर दार बाहेरून लावून घेईन. ( आरशासमोर येते. )

सचिन : ( आतून तान घेतो, ‘ चाहे कोई मुझे जंगली कहे…’ दार किलकिलं करून डोकं बाहेर काढतो.) लल्या, ए ललू, माझं ऐक. पुरुष जात्याच स्वच्छ असतात. बॉर्न क्लीन ! ( ललिता केसात कंगवा अडकवून पुढे होते.

टॉयलेटचा दरवाजा ओढून घेते. बाहेरून कडी लावते. ) ए, ए, माझे माऊली, दार लावू नको.

ललिता : वॉश घ्या, मग उघडते. ( पुन्हा आरशासमोर येते.)

सचिन : ( टॉयलेटच्या व्हेंटिलेटरमधून तोंड काढतो.) श्यू, श्यू... ...! ( ललिता इकडे तिकडे बघते. ) लल्या, तू ये ना आंघोळीला.

ललिता : तुला वेड लागलंय्.

सचिन : ह्यालाच हनीमून म्हणतात.

ललिता : मी येणार नाही.

सचिन : मग कडी काढ. मी वॉश घेतला.

ललिता : एवढ्यात ?

सचिन : येस् !

ललिता : नळाचा आवाजसुद्धा आला नाही.

सचिन : एवढा सोडावा लागत नाही. पुरुष जात्याच स्वच्छ ...अंगावरच्या मळाचा गणपती केला तो पार्वतीनं. तेव्हा ... आंघोळीची गरज ... (दरवाजा वाजतो. सचिन पटकन व्हेंटिलेटर बंद करतो. ललिता दार उघडते. कार्टर येतो.)

कार्टर : सचिनशेट ...

ललिता : आहेत. काही काम होतं ?

कार्टर : हे साहेबांना द्यायचं.

ललिता : हे तुला त्यांनी कधी सांगितलं ? (कार्टर न बोलता बाटल्या टेबलावर ठेवतो. जातो. ललिता दार लावते ... कार्टर थांबायची खूण करतो.) आता काय राहचलं ?

कार्टर : खिडक्यांचे पडदे ...

ललिता : चालतील नसले तरी !

कार्टर : आत्ता चालेल. सकाळी फार ऊन येतं. तुम्ही उशीरा ऊठणार. ऊन थेट इथवर येतं. पूर्वेची दिशा आहे ना ... (पडदे लावतो.)

ललिता : कायरे कार्टर, ह्या खोलीची तुला एवढी माहिती कशी ?

कार्टर : (लाजून हसतो). ते साहेबांना विचारा. (जातो. सचिन बाथरूमचं दार वाजवायला लागतो. ललिता दार उघडते)

सचिन : (तोंड बाहेर काढीत) माझे कपडे ? (ललिता त्याला कपडे देते.) थँक्स! (ललिता बॅग लावण्यासाठी पलंगाजवळ येते. आतून टेपरेकॉर्डर काढते. त्या क्षणी तिला मोदींचा आवाज ऐकू येतो. ती कमालीची अस्वस्थ होते. टेपरेकॉर्डर बाहेर काढते. खोलीत निरनिराळ्या ... जागेवर ठेवून बघते. तिचं समाधान होत नाही. ती भिरीभिरी फिरत राहते. पुनः एकवार

सचिनची ' चाहे कोई मुझे ... ...'ची ओळ ऐकू येते. ललिता टेपरेकॉर्डर बॅगेत टाकते. सचिन बाहेर येतो. आरशासमोर उभा राहतो. तिथलं पुडकं दिसतं ) दॅट्स फाईन. (पुडक उघडतो.) हे काय ? एवढंच ? ...कार्टरनं आणखीन काही आणलं नाही ?

ललिता : काय हवं होतं ?

सचिन : तुला समजायचं नाही. ( बेल वाजवतो, ती वाजत नाही. ) हा कार्टर लबाड प्राणी आहे. बंडलं फेकतो.

ललिता : काय झालं !

सचिन : ह्याच खोलीत म्हणे राजेश खन्ना उतरला होता.

ललिता : अय्या, खरंच ?

सचित : इथं कॉलबेल पण वाजत नाही. असल्या हॉटेलात राजेश खन्ना कशाला येईल ? बंडल फेकतो (पुन्हा बेल वाजवतो. वाजत नाही.) अठ्ठेचाळीस एकर जमीन आहे म्हणे. ऊस पिकवतो की कंड्या पिकवतो ? ( जायला लागतो. )

ललिता : कुठं जातोस ?

सचिन : दोन मिनिटांत आलो.

( जातो. ललिता आतून दार लावून घेते. मोदींचा ...आवाज येतो. पुनः टेपरेकॉर्डर घेऊन जागा शोधते. सापडत नाही. सचिन दार वाजवतो. ललिता दार उघडण्यापूर्वी नाइलाजानं टेपरेकॉर्डर पलंगाखाली ठेवते. दार उघडते. सचिनच्या हातात बर्फाचा बाऊल आणि एक बाटली. )

ललिता : काय आणलंस ?

सचिन : ह्याला लाईम ज्यूस कॉर्डियल म्हणतात. आणि हा चक्क बर्फ आहे.

ललिता : पण हे सगळं कशासाठी ?

सचिन : ते आताच सांगायला हवं का ?

ललिता : सांगा.

सचिन : श्रीखंडात केशर का घालतात ? रांगोळीत गुलाल का टाकतात ? ... थंडगार पाण्यात वाळा का टाकतात ? तंबोऱ्याला जवारी का लावतात?

ललिता : मला नाही कळत.

सचिन : बायका इश्श का म्हणतात ?

ललिता : मला नाही माहीत.

सचिन : तेच फार छान आहे. माणसाला सगळ्या गोष्टी कळूच नयेत. खूप गोष्टी अनाकलनीय असल्या की आयुष्याबद्दलचं कुतुहल टवटवीत राहतं. पुढं काय घडणार आहे, हे माणसाला कळू न देण्यात निसर्गानं माणसावर फार

उपकार करून ठेवला आहे. उद्याला अस्तित्व का आहे माहीत आहे ? (नाही म्हणते.) तो अनभिज्ञ आहे म्हणून ! तो अनभिज्ञ आहे म्हणून 'अद्‌भुत' आहे. येणारा क्षण दिवस परिचयाचा झाला की 'अद्‌भुत' संपलं. 'भूतकाळ' झालं. जाऊ दे ! फरगेट एव्हरीथिंग ! (तिला आरशासमोर नेतो.) मी कसा दिसतो सांग.

ललिता : इश्य ! मला नाही माहीत !

सचिन : इश्य हा शब्द चांगला आहे, पण उत्तर म्हणून चांगला नाही. तेव्हा साध्या-सरळ-सोप्या शब्दात सांग, मी कसा दिसतो.

ललिता : मला नाही माहीत !

सचिन : बरं, आणखी एक सांगशील ? (मानेनं हो म्हणते.) मी तुला का आवडलो ? (ती बघत राहते.) वेडाबाई, अशी बघत काय राहतेस ? (ती ओंजळीत तोंड लपवते.) लल्या, तू मला लाजली आहेस ? फॅण्टॅस्टिक ! मुंबईच्या ठरलेल्या हॉटेलात यायला मला दोन मिनिटं जर उशीर झाला तर कचाकच भांडणारी ही पोरगी अशी लाजू शकते ? (तिचे हात तोंडावरून दूर करतो.) बोल ना !

ललिता : काय ?

सचिन : अगदी ह्या क्षणी तुला काय वाटतंय, ते सांग ना !

ललिता : तू असंच बोलत राहावंस आणि मी ऐकत राहावं, असं वाटतं.

सचिन : मला नाही तसं वाटत. आज दोघांनी बोलायचं. अगदी सगळं—सगळं ! हातचं राखून न ठेवता ! एकमेकांशी प्रतारणा न करता !
(ललिता पलंगावरून उठते. गॅलरीच्या दाराशी येऊन उभी राहते. ओंजळीत तोंड लपवते. तिला हुंदका येतो. सचिन पटकन् तिच्याजवळ जातो.) लल्या, राजा काय झालं ? (मानेनं नकार.) तब्येत बरी नाही का ? (नाही म्हणते.) तुला नानांची आठवण झाली का ? (मानेनं नकार.) मी ड्रिंक्स मागवली म्हणून राग आला ? (मानेनं नकार.) तुला माझ्याबद्दल काही समजलं ? (पुन्हा मानेनंच नकार.) तू जर काही बोलली नाहीस तर मला कळणार कसं ? तू काय होतंय ते सांग, काय हवंय ते सांग. मी तुझ्यासाठी काहीही करायला तयार आहे.

ललिता : मला काही नको राजा, तू खूप केलंस.

सचिन : मी लग्न करण्यापलीकडे काहीही केलं नाही ह्याची मला कल्पना आहे. आणि हे लग्नही, तुमची जमीन विकल्यामुळे होऊ शकलं ह्याचीसुद्धा मला जाणीव आहे. तुझ्या मनात तसंच जर काही आलं असलं ...

ललिता : प्लीज, सचिन प्लीज, तसं काही नाही. कुणाची शपथ घेतल्यावर तुझा विश्वास बसेल ?

सचिन : शपथेची गरज नाही. माझा तुझ्यावर पूर्ण विश्वास आहे.

ललिता : मग काय करू ?

सचिन : फक्त रडू नकोस. निदान आज तरी ! नंतर केव्हाही रडलीस तर फक्त माझ्याजवळ असताना रड. कारण, तुझ्या रडण्याची माझ्याकडून जशी चेष्टा होणार नाही तशीच उपेक्षाही !

ललिता : (भावनावेगानं) तू फार फार मोठा आहेस. हे बघ, मी डोळे पुसले. (हसते.)

सचिन : काय पाखरू हसलं पण ! ये आता आरशासमोर ! तुला मी तुझा अवतार दाखवतो.

(ललिता आरशासमोर येते.)

ललिता : सचिन, आय अॅम एक्स्ट्रीमली सॉरी. मी एका मिनिटात येते.

(टॉवेल घेऊन टॉयलेटला जाते. सचिन गॅलरीचं दार लावतो. खिडकी लावतो. बाहेरचं दार लावताना ' गुड नाईट कार्टर ' म्हणतो. खोलीतला प्रकाश मंद करतो. ललिता बाहेर येते. तिनं केस मोकळे सोडलेले आहेत.)

सचिन : फॅण्टॅस्टिक ! आता मस्त हसून मला एक किस् दे. आणि नीट हसली नाहीस तर गुदगुल्या करून तुला बेजार करीन.

(जवळ जातो. तिला गुदगुल्या करायला लागतो. ती हसायला लागते. प्रकाश मंद होत जातो. दोघांचं हसणं मोठं–मोठं होत जातं.)

सचिन–ललिता ह्यांच्या हसण्याचा आवाज येत असताना स्टेजवर पुन्हा प्रकाश पडतो.

मोदीचं ऑफिस : ऑफिसात एकटी ललिता. ती टेप ऐकते आहे. हसणं कमी होत जातं आणि त्यांचा संवाद सुरू होतो.

सचिन : लल्या, गेल्या तीन वर्षांत मी कितीतरी वेळा तुझं चुंबन घेतलंय्...

ललिता : माहीत आहे. एकदा तर हॉटेलातल्या पोऱ्यानं पाहयलंसुद्धा ! ...

सचिन : दॅट इज नॉट द पॉइण्ट ! मला निराळं सांगायचं होतं. तीच तू, तेच हे ओठ, हा स्पर्शही तोच, पण लल्, आज सगळं निराळं वाटतंय.

ललिता : होय राज, आज खरंच सगळं निराळं वाटतंय.

सचिन : तू प्रेयसीची पत्नी झालीस. आता तुला माझ्यापासून कुणीही नेणार नाही.

ललिता : (जरा वेळानं) होय, होय, जरा हळू, एवढा जोर कुठून येतो... ...

(ललिता हे वाक्य ऐकल्याबरोबर शहारून उठते, पुढे येते. ती विलक्षण कावरीबावरी होते. तिच्यावर एकटीवर प्रकाश आहे. तिच्या डोळ्यांत पाणी येतं. पार्श्वसंगीत मध्येच मोठं होतं. पार्श्वसंगीताचा आवाज कमी झाला की सचिनचा एखादा संवाद ऐकू येतो. तशी ललिता जास्त बेचैन होते.... 'लल्या, अग तुझ्या सचिनलाच काय लाजतेस '...पार्श्वसंगीत ...' आज मी तुला संपूर्ण पाहणार ' ... पार्श्वसंगीत ... ज्या माणसानं वटणांऐवजी हुकांचा शोध लावला त्याला मरेपर्यंत फाशी ... संगीत ... 'अरे तुला बटणं काढेपर्यंत दम निघत नाही का ? '... संगीत ... ललिता मागे फिरते. टेप बंद करते. थबकून ऊभी राहते. दरवाजापर्यंत जाते. पुन्हा परत येते. टेप चालू करते ... आता राजा, मनसोक्त बघून घे.... ललिता कानावर हात ठेवते. पार्श्वसंगीत वाढत जातं. मोदी येतात. कानावर हात ठेवून शून्यात नजर लावून उभ्या राहयलेल्या ललिताकडे बघतात. जवळ येतात. तिच्या खांद्यावर थोपटतात. ती भानावर येते.

ललिता : सर, यू हॅव कम ...

मोदी : तुमी वार्ता केला तवा मी आले.

ललिता : पण सर ...

मोदी : आमचा टेप ...

ललिता : सर ...

मोदी : यू हॅव प्रॉमिस्ड मी दॅट यू वुड्ल नॉट बॅक आऊट ... !

ललिता : मी तसं म्हणाले, पण सर, आय ॲम नॉट एबल टू ...

मोदी : नो, नो, आय काण्ट ॲक्सेप्ट धिस !

ललिता : सर, आय प्रे यू. दुसरं काही मागा, पण टेप नको.

मोदी : हॅव यू रेकॉर्डेड युवर डायलॉग ? (ललिता मानेनं 'हो' म्हणते) कसा ज्याला रेकॉर्डिंग ? (ललिता मान खाली घालते.) दॅट मीन्स, इट इज सक्सेसफुल् ! इज इट ? ... (मान फिरवते. मोदी त्या बाजूला येतात.) घेसपांडे, नाऊ काइंडली ओब्लाइज मी ! गिव्ह मी द टेप.

ललिता : साहेब, खरंच सांगते, दुसरं काहीही ...

मोदी : नो बाबा, आय डोण्ट वॉण्ट एनिथिंग एल्स. गॉड हॅज गिव्हन मी एव्हरीथिंग, आय वॉंट टेप ...

ललिता : (थोडी चिडते.) तुम्ही टेपचं काय करणार आहात ?

मोदी : मिस्टर ॲंड मिसेस् मोदी वुड्ल लिसन् ॲंड ...

ललिता : वुड्ल एन्जॉय, असंच ना ? धिस इज सिली !

मोदी : ते तो सिली हाय, आय डोण्ट डिनाय.

ललिता : आय रिक्वेस्ट यू वन्स अगेन...

मोदी : पण तुमी घुस्सा कशाला करते ?

ललिता : आय डोण्ट डिझायर टू डिसिव्ह सचिन.

मोदी : तुमी डायलॉग टेप केला तवा डिसिव्ह नाही का केला हजबंडला ?

ललिता : (थोडं मोदींना, काहीसं स्वतःशी)–खरंच, माझ्या लग्नाच्या पहिल्या-वहिल्या रात्री, ज्याच्याबरोबर सगळं आयुष्य घालवायायचं त्याला मी का फसवलं ? जगातली एखादी मुलगी तरी अशी वागली असेल का ? आणि मोदीसाहेब, जगातल्या एखाद्या तरी साहेबानं ही असली विचित्र मागणी कुणाकडे केली असेल का ? (मोदी हसतात. ललिताचा आवाज चढतो.) तुम्ही तुमच्या मुलीजवळ असली मागणी केली असतीत ?

मोदी : अरे डिकरी......

ललिता : तुम्ही आमची जमीन विकत घेतलीत. आम्हाला संसाराला नवी जागा मिळाली. पण साहेब, त्याच्या बदली तुम्ही माझ्या सुखाला कायमची काजळी लावली.

मोदी : आमी असा काय केला...?

ललिता : एखाद्या निष्पाप माणसाशी प्रतारणा करावी लागली तर किती इंगळ्या डसतात, हे तुम्हाला कळायचं नाही. बिचारा भाबडेपणानं मला शंभरदा, हजारदा विचारत होता, लल्या तुझं मन शांत नाही, तू फुललेली नाहीस. माझं काही चुकलं असेल तर सांग. मी गप्प होते. काय सांगणार ? इत-रांचा हनीमून कसा असतो, मला माहीत नाही; आणि माझा कसा झाला हेही कुणाला समजायचं नाही. मी जे सोसलं ते कुणीच सोसलं नसेल. आणि मि. मोदी, यू आर रिस्पॉन्सिबल फॉर दॅट. तुम्ही मला पस्तीस हजार दिलेत म्हणजे माझं मनःस्वास्थ्य विकत घेतलंत असं समजू नका. तुम्ही पैसे दिलेत, आम्ही जागा दिली. आता मी तुमचं काहीही देणं लागत नाही.

मोदी : यू माइण्ड घेसपांडे, यू वुइल हॅव टू पे व्हेरी हायली.

ललिता : सर, जास्तीत जास्त काय होईल ? नोकरी सोडायला लावाल, इतकंच ना ?आय ॲम प्रिपेअर्ड.(भरभरा टेबलाजवळ जाते. टेपरेकॉर्डर उघडते. टेप पाकिटात टाकते. आतून एक कागद काढते.)

मोदी : व्हॉट इज धिस ?

ललिता : माय रेसिग्नेशन. सचिननं बांगड्या भरलेल्या नाहीत.

(कागद भिरकावते. पुन्हा स्टेजच्या फुल लाईट्सजवळ येते. तिच्यावर स्पॉट. ती डोळ्यांत पाणी आणून शून्यात बघते. ती हुंदके देतेय्. टेपमधून

हसण्याचा आवाज येतोय. ड्रीम सिक्वेन्स संपतो आणि खरोखरच मोदी येतात. ते हात पुढे करतात. ललिता टेप काढून देते. 'आमी ये टेप दावते'— म्हणत जातात. ललिता खुर्चीत कोसळते. टेबलावर डोकं टेकते.)

(शंकर येतो. त्याचा चेहरा कावराबावरा. तो ललिताला बघतो.)

शंकर : आँ, बाईसाहेब ? माझ्या अगोदर... (ललिता मान उचलते, नीट बसते.) केव्हा आलात ?

ललिता : झाला एक तास.

शंकर : ऑफिस कुणी उघडलं ?

ललिता : मीच ! (शंकरचा चेहरा पाहून) माझ्याजवळ किल्ली होती. साहेबांनी अर्जंट काम आहे म्हणून बोलावलं होतं, किल्ली दिली होती.

शंकर : म्हणजे साहेब पण आले आहेत ?

ललिता : (विचार करून) नाही ना, मी आले पण साहेबांचाच पत्ता नाही.

शंकर : म्हणजे केव्हाही येतील.

ललिता : शक्य आहे.

शंकर : चला शंकरराव पाटचा पुसायला हव्यात, पॉलीश करायला हवं.

(जातो. एकेकजण येऊ लागतात. सह्या करून नेहमीप्रमाणे आत जातात. साळवी येतात. त्यांच्या डोक्याला बॅण्डेज आहे. नेहमीप्रमाणे फोटो, उदबत्ती, अंगारा करतात. ललितासमोर पुडी धरतात. ती यांत्रिकतेनं अंगारा घेते. 'थँक्स' म्हणते. साळवी जाग्यावर जाऊन बसतात. घाटपांडे येतात.)

घाटपांडे : गुडमॉर्निंग एव्हरीबडी ! (ललिता स्मित केल्यासारखं करते. साळवी 'पांडुरंग' 'पांडुरंग' म्हणतात.) काय साळवीबाबा, तुमची जखम काय म्हणते ?

साळवी : जरा बरी आहे.

घाटपांडे : झोप लागली होती ?

साळवी : मोदीसाहेबांनी ट्रॅन्क्विलायझर दिलं होतं.

घाटपांडे : मला वाटतं, तुम्ही संपूर्ण बरं झाल्याशिवाय कामावर येऊ नये. जखम डोक्यावरच आहे. अद्यापी सूज ओसरलेली नाही.

साळवी : ठणका आहे थोडा !

घाटपांडे : म्हणूनच सांगतो घरी पळा, तुमचं टेबल मी बघतो.

साळवी : ते स्वप्नाळकर गेले चार दिवस आले नाहीत, तुम्ही कितीजणांचं टेबल सांभाळणार ?

घाटपांडे : डोण्ट वरी अबाऊट इट ! तुम्ही घरी जा.

साळवी : आज सोनाळकर आले कामावर, तर मी जाईन.

(सोनाळकर येतात.)

सोनाळकर : हा मी आलोच !

घाटपांडे : थिंक ऑफ द डेव्हिल ... ...

सोनाळकर : येस्, डेव्हिल इज साक्षात हजर ! अरे, संत साळवीमहाराज, व्हॉट इज रॉंग वुइथ युवर कपाळ ?... तुकारामाच्या आवडीनं लाटणं घातलं वाटतं कपाळात ?

साळवी : पांडुरंग, पांडुरंग !

सोनाळकर : अरे काय झालं ते सांगा ना ?

घाटपांडे : सोनाळकर, मी तुम्हाला नंतर सगळं सांगतो. त्यांना बोलायला लावू नका.

सोनाळकर : ओ. के. ! तुम्ही सांगा.

घाटपांडे : अगोदर स्वप्न–

( ललिता मध्येच उठून जाते. )

सोनाळकर : ( तिच्याकडे बघत ) ह्या बाई अजून नॉर्मलला आल्या नाहीत वाटतं ?

घाटपांडे : नाही ना !

सोनाळकर : तुम्ही विचारलं नाहीत ?

घाटपांडे : ती आपण होऊन मला सगळं सांगते, पण लग्नानंतर तिच्यात फारच फरक पडलाय. मी एक-दोनदा टॅप करायचा प्रयत्न केला, पण तिनं जितक्यास तितकंच उत्तर दिलं.

सोनाळकर : होतं असं कधीकधी ! ( कामाला लागतात. घाटपांडे बेल वाजवतात शंकर येतो. ) सोनाळकरसाहेबांना दे. (शंकर चिठ्ठी सोनाळकर-साहेबांना देतो. )

सोनाळकर : ( चिठ्ठी वाचून ) ... घाटपांडे, कमाल करताय् ! स्वप्न सांगा काय ? इथं मी स्वप्नांना वैतागलोय्. एखाद्या डॉक्टरकडे जाऊन स्वप्न पडणार नाहीत ह्यासाठी एखादं औषध असेल तर मिळवणार आहे.

घाटपांडे : अॅलोपथीमध्ये काही औषध सापडेल असं वाटत नाही. तुम्ही होमिओ-पॅथी ट्राय करा. काय साळवी ?

साळवी : मन शांत ठेवावं, वृत्ती स्थिर ठेवावी, नजर आत वळवावी, दहा मिनिटं चिंतन करावं, मग स्वप्न वगैरे काही पडत नाहीत.

घाटपांडे : साळवीबाबा, तुमचं चूक नाही. पण ते आम्हाला कसं साधायचं ? त्या-साठी साधना हवी. तेव्हा स्वप्नाळकर, होमिओपॅथी ...

सोनाळकर : म्हणजे खेळ खलास !

घाटपांडे : का ?

सोनाळकर : हे होमिओपॅथीवाले काय–काय प्रश्न विचारतात ह्याची तुम्हाला कल्पना नाही. प्रथम विचारतील, किती वाजता झोपता ? ...कोणत्या दिशेकडे पाय करता ? ...कोणत्या कुशीवर झोपता ? डाव्या... ... उजव्या ? ... ...कोणत्या कुशीवर जास्त स्वप्नं पडतात ? झोप लागल्यावर साधारण किती मिनिटांनी कुशीवर वळता ? ...ह्या सगळ्याचा मला महिनाभर अभ्यास करायला लावतील, आणि... नंतर औषध सांगतील, ह्या चार गोळ्या स्वप्न संपल्याबरोबर घ्यायच्या. ह्यापेक्षा स्वप्नं परवडली.

घाटपांडे : पडू देत.

सोनाळकर : आणि अंगाशी येऊ देत.

घाटपांडे : ती कशी काय ?

सोनाळकर : मी तीन-चार दिवस कामावर का आलो नाही, विचारलंत ?

घाटपांडे : का ?

सोनाळकर : स्वप्नांमुळे !

घाटपांडे : आता सविस्तर सांगा.

सोनाळकर : शनिवार आपला अर्धा दिवस. त्या रात्री फार मजेदार स्वप्न पडलं. पादचाऱ्यांसाठी बांधलेले एकूण एक पूल पाडून टाकलेत असं स्वप्न पडलं.

साळवी : तुमच्या ह्या स्वप्नाचं खरंच कौतुक करायला हवं. खरोखरच लाखो रुप-यांचा भुगा का केला जातो हेच मला कळत नाही.

घाडपांडे : आता ह्या पुलांनी तुमचं काय घोडं मारलं बुवा ?

सोनाळकर : पांडे, प्रश्न विचारायचे म्हणून विचारू नका. मला सांगा, जी माणसं दोन-दोन तास गर्दीनं गच्च भरलेल्या गाडीतून, गुदमरत प्रवास कर-तात त्यांना स्टेशनातून बाहेर पडताच पुन्हा वीस-वीस फूट उंचीचे जिने चढायला लावायचे.

साळवी : तेही ऑफिस गाठायची निकड असताना... !

सोनाळकर : हार्टच्या पेशण्ट्सचा कुणी विचार केलाय् ह्या असल्या योजना राबव-ताना ?

घाटपांडे . अहो, ते सगळे पूल मीच बांधल्यासारखा मला जाब का विचारता ?

साळवी · तुम्हाला माइल्ड ॲटॅक येऊन गेलाय् म्हणून त्यातलं दु:ख तुम्हाला पटकन

समजेल, म्हणून ... ...

घाटपांडे : मी त्या पुलांच्या नादी लागत नाही. पोलिसाला चार आणे टिकवतो आणि कुठंही रस्ता क्रॉस करतो. पण सोनाळकर, ह्या स्वप्नापायी ऑफिसला दांडी ... ...

सोनाळकर : त्यासाठी नाही हो ! रविवारी आणखीन मजेदार स्वप्न पडलं. सोमवारी तेच. मंगळवारी पण तेच. आणि ते म्हणजे, मुंबईच्या फूटपाथवर एकही फेरीवाला नाही. फूटपाथ ओस पडलेले आहेत आणि कामावर जाणारी मंडळी शांतपणे फूटपाथवरून चाललेली आहेत. पादचारी फूटपाथवरून चालत आहेत म्हणून रस्ते वाहनांना मोकळे झालेले आहेत, त्यामुळे हॉर्न न वाजवता त्यांनाही व्यवस्थित ड्रायव्हिंग करता येत आहे.

साळवी : (एकाएकी हुंदके द्यायला लागतात.) सोनाळकर, इथंच थांबा. पुढचं स्वप्न सांगू नका. एवढं चांगलं, आदर्श– मला ऐकवत नाही.

घाटपांडे : सोनाळकर, तुम्हाला कितीही त्रास झाला. तरी चालेल, पण होमिओपाथी ट्राय करा.

सोनाळकर : ह्या स्वप्नापायी माझं काय झालं माहीत आहे ? फूटपाथ खरोखरच रिकामे आहेत असं समजून मी कामावर यायला निघालो; आणि त्या नादात माझा एका स्टॉलवर पाय पडला. त्याच्या आरसा फुटला.

घाटपांडे : बरं मग ?

सोनाळकर : तुफान भांडण ! हां हां म्हणता रस्त्यावरचे पंचवीस फेरीवाले ! एकत्र झाले. पोलीस त्यांना सामील. तो लांबून गंमत पाहत होता.

साळवी : पांडुरंगा ! पुढे ?

सोनाळकर : पंचवीस फेरीवाले एका मिनिटात एकत्र होतात, पण साळवीशेट, रस्त्यावरून जाणाऱ्या हजारो पादचाऱ्यांपैकी दहाजण काही पाठीशी उभे राहयले नाहीत.

घाटपांडे : मग ? (सोनाळकर पाठ करून शर्ट वर करून दाखवतात.) माय गुडनेस! हा काय प्रकार आहे हो ?

सोनाळकर : ‘कोई बी चीज उठाव’ फेरीवाल्यांनी दिलेली भेट. पोट भरायची निकड असलेल्या एका जमातीनं तीच गरज असलेल्या दुसऱ्या जमातीला दिलेली भेट !

घाटपांडे : छे, छे ! हे सहनशक्तीच्या पलीकडचं आहे. आय जस्ट डोण्ट अण्डरस्टॅण्ड ! हे असं कसं होऊ शकत ? का ? का होतं? आम्ही कोणीच नाही का ? आम्ही टॅक्स भरतो. आम्ही नागरीक आहोत. आम्हाला पाऊलवाटे-

पुरताही रस्ता मिळू नये ?सोनावळकर– तुम्ही गप्प का बसलात ?

सोनाळकर : कारण मी सामान्य माणूस आहे. जाऊ दे ! साळवींना काय झालं ?

घाटपांडे : नेहमीचीच कथा ! दोन गाड्या कॅन्सल. तिसरी फास्ट लोकल. साळवींना ती पकडावीच लागली फूटबोर्डवर लटकून आले आणि घाटकोपरजवळच्या एका झोपडपट्टीतल्या मुलानं गंमत म्हणून गाडीवर दगड मारला तो नेमका साळवींना लागला. नशीब बलवत्तर म्हणून डोळा बचावला. हे नेमकं ह्याच पांडुरंगभक्ताला का व्हावं ?

सोनाळकर : हे साळवींनाच होणार !

घाटपांडे : का पण ?

सोनाळकर : कॉमन मॅन म्हणून !

घाटपांडे : नुसत कॉमन मॅन–कॉमन मॅन करू नका. बोट ठेवून नक्की कोण ते सांगा. (सोनाळकर आणि साळवी स्टेजच्या मध्यावर शेजारीशेजारी येऊन उभे राहतात आणि ठराविक लयीत आलटून–पालटून बोलतात–)

सोनाळकर : कॉमन म्यान, कॉमन म्यान ही तर आमची आहे शान.

साळवी : महिनाभर काम करून असतो काय तो आमचा पगार !
आमचा त्यावर असतो केवळ दोन–तीन तासच अधिकार !

सोनाळकर : आमच्या दाराशी गाडी नाही, म्हणून आम्हाला प्रतिष्ठा नाही.

साळवी : आम्ही झोपडीत राहत नाही, म्हणून प्रतिष्ठा डावलत नाही.

सोनाळकर : खिशात रेल्वेपास असतो अन् चेहरा बिनतिकिटाचा दिसतो.

साळवी : दर वाढायच्या आत तीन महिन्यांचा पास,
ही आमच्या धोरणाची कमाल असते खास !

सोनाळकर : बुद्धिमत्तेशिवाय तरणोपाय नाही हा आमचा बाणा !
मग आमचा एकच उद्योग मुलांना अभ्यासासाठी ताणा !

साळवी : दहाव्या आत नंबर ठेवायलाच पाहिजे.

सोनाळकर : ऐंशी टक्क्यांवर मार्क मिळालेच पाहिजेत.

साळवी : बिचारी पोरं मिळवतात रेटून.

सोनाळकर : पण मेडिकलचा प्रवेश ? देतात हाकून.

साळवी : बुद्धीप्रमाणेच नशीबाचा आधार. ठेव बाबा त्यावर मदार, असे म्हणून करतो साजरे, रडके तोंड थोडे हसरे !

सोनाळकर : दुकानात आम्ही जातो पण सेल संपल्यावर पोहोचतो.

साळवी : घरी एखादा पाहुणा येतो तेव्हा घरातला गॅस जातो.

सोनाळकर : सार्वजनिक इस्पितळं परवडतात, पण आम्हाला आवडत नाहीत.

साळवी : खाजगी आम्हाला आवडतात, पण आम्हाला परवडत नाहीत.

सोनाळकर : प्रवासात न लागणारी खिडकी आमच्याच सीटजवळ असते नेमकी.

साळवीं : दांडा मोडलेली छत्री, आमचीच अशी आमचीहि खात्री !

घाटपांडे : पण ही परवड असतेच का तुमची ?

सोनाळकर : एक तास उशीरा जन्म म्हणून ही कटकट जन्माची.

साळवी : एक तास लवकर जन्म तरी कटकट तीच नेहमीच...

सोनाळकर : नाहीतर पंतप्रधान होण्याचा योग होता पत्रिकेत.

साळवी : किंवा राष्ट्रपती होण्याचा योग होता हो पत्रिकेत.

सोनाळकर : हे घडत नाही म्हणून हाकलतात मोटारवाले रस्त्यावरून.

साळवी : हे घडलं नाही म्हणून हाकलतात फेरीवाले फूटपाथवरून.

(मोदींच्या मोटारीचा हार्न ऐकू येतो. साळवी, सोनाळकर जाग्यावर बसतात. ललिता येते. शंकर बाहेर धावतो. )

वेळ संध्याकाळ.

मोदींचं ऑफिस सुटलेलं आहे. ललिता ऑफिसातच आहे. घाटपांडे तोंड धुऊन टॉवेलला हात पुसत येतात.

घाटपांडे : तू गेली-नाहीस अजून ?

ललिता : सचिन न्यायला येणार आहे.

घाटपांडे : एक प्रश्न विचारला तर नीट बोलशील ?

ललिता : तुम्ही असं विचारता ?

घाटपांडे : नीट म्हणजे पूर्वीसारखं ! लग्नाच्या आधी जसं बोलत होतीस तसं !

ललिता : तुम्हाला असं का वाटावं हेच मला कळत नाही. (घाटपांडे जायला निघतात.) हे काय ? थांबा ना ! काहीतरी विचारणार होतात त्याचं काय झालं ?

घाटपांडे . ललिता, लग्नानंतर माणसं बदलतात हे मला मान्य आहे. तरीही वाटलं, तू फारच बदललीस. तू माझ्याशी पूर्वीसारखं बोलत नाहीस म्हणालो तर तेही तू मोकळेपणानं मान्य करीत नाहीस. मग... (जायला लागतात.)

ललिता : प्लीज जाऊ नका. मी चुकले. माझं मन अगोदरच थाऱ्यावर नाही.

घाटपांडे : ते तर मी कधीच ओळखलं होतं. का ते तू आपण होऊन सांगशील ह्याची वाटही पाहयली. काही बोलली नाहीस तेव्हा गप्प बसलो. सांग आता. काय प्रकार आहे ?

ललिता : कसं सांगू ?

घाटपांडे : पैशांची काही अडचण आहे का ?

ललिता : छे, छे ! साळवींचा पांडुरंग मला मोदींच्या रूपात भेटल्यावर आणखीन काय हवं ? त्यांच्यामुळे नानांचा प्रॉब्लेम सुटला, जागा मिळाली, संसाराला सुरुवात झाली. पण...

घाटपांडे : सचिनशी भांडण ? (ती मानेनं नाही म्हणते.) ललिता, एक खाजगी प्रश्न विचारू ?

ललिता : काहीही विचारा.

घाटपांडे : परमेश्वर करो आणि तसं न घडो. तरीही शंका निरसन करून घ्यायचं म्हणून विचारतो. सचिनमध्ये काही फिजिकल डिसॅबिलिटी ?

ललिता : नाही हो, तसं सगळं नजर लागेल असं आहे आणि तरीही कुठंतरी तडा गेलाय्.

घाटपांडे : माथेरानला किती दिवस होतात ?

ललिता : आठ दिवस राहणार होतो, पण तिसऱ्याच दिवशी परतलो.

घाटपांडे : काही विशेष कारण ? (ललिता गप्प.) समजलो मी ! (ललिता चमकून बघते.) असंच काहीतरी कारण होतं की जे तू सचिनलाही सांगू शकली नाहीस.

ललिता : तुम्हाला कुणी सांगितलं ?

घाटपांडे : प्रेसिडेंट कार्टरनं सांगितलं.

ललिता : तुम्हाला सचिन नक्की भेटला होता म्हणजे !

घाटपांडे : अर्थातच ! मी कुठे नाकारतोय ? सचिन भेटला म्हणून तर तुझ्या खनपटीला बसलोय. मला आता सविस्तर समजायलाच हवं. विचारू शकतो ना ? (ललिता चमकून बघते.) माझ्यासाठी नको, सचिनसाठीच सगळं सांगायला हवं.

ललिता : सचिननं तुम्हाला काय–काय सांगितलं ?

घाटपांडे : तो काय सांगणार ? तू मूडमध्ये नव्हतीस म्हणून तोच कावराबावरा झाला होता. तू तिथं इतकी रेस्टलेस का होतीस हे त्याला हवंय. त्याच्याजवळ बोलली नाहीस. माझ्याजवळ बोलशील अशी त्याची कल्पना...

ललिता : घाटपांडे, साळवींच्या पांडुरंगानं माझ्याकडे भलत्याच प्रसादाची मागणी केली, आणि सचिनशी प्रतारणा करून मी साहेबांची मागणी पुरी केली.

घाटपांडे : मला आली कल्पना ! (ती थक्क होऊन बघते.) तुम्ही... साहेबांना टेप दिली असेल.

ललिता : होय ! आणि आता ते टेन्शन आयुष्यभर बाळगायचं. इथून पुढे मोकळा

श्वास कधीच घेता येणार नाही.

घाटपांडे : असं का म्हणतेस ?

ललिता : त्या टेपनं साहेबांना सगळं सांगितलं असेल.

घाटपांडे : तुम्ही टेप दिलीतच का ?

ललिता : साहेबांच्या उपकाराच्या ओझ्याखाली मी इतकी वाकले होते, की प्रथम मी त्यांना शब्द दिला. शब्द देईपर्यंत त्यांची इतकी काही विक्षिप्त अपेक्षा असेल हे माझ्या ध्यानी-मनी नव्हतं. साहेबांनीसुद्धा हे असलं विचित्र मागणं का मागावं ?

घाटपांडे : पारशी माणसं फार मजेदार असतात. मायाळू, प्रेमळ, विलक्षण परोपकारी आणि विचित्रही ! असं म्हणतात, पारशांच्यात दोनच प्रकार. एक खडा पारशी, बाकीचे सगळे वेडा पारशी !

ललिता : ह्याच विक्षिप्तपणापायी त्यांनी माझ्या टेपचा गैरवापर केला तर ?

घांटपांडे : थोडी ताठ भूमिका पत्करून टेप दिली नसतीस तर ?

ललिता : मी माझ्याशीच खूप भांडले, बंड पुकारलं, प्रतिकार केला. पण ... साहेब ...

घांटपांडे : साहेब समोर आले आणि शांतपणे तुम्ही टेप त्यांच्या हवाली केलीत, असंच ना ?

ललिता : होय, अगदी तसंच घडलं.

घाटपांडे : मग आता मुळीच काळजी करू नकोस.

ललिता : त्यांनी माझी टेप कुणाला ऐकवली तर ? (घाटपांडे नकारात्मक हात हलवतात.)

घाटपांडे : त्याला टेप देणारी तू एकटीच व्यक्ती नाहीस. (ती आश्चर्यानं बघते.) मीही साहेबांना टेप दिलेली आहे.

ललिता : पहिल्या रात्रीची ?

घाटपांडे : पहिल्या रात्रीची नाही. आमची बायको घासाघीस–विशारद आहे. बोहारणीबरोबर एका वाटीसाठी तिनं केलेल्या अठ्ठावीस मिनिटांच्या वाटाघाटीची ती टेप मोदीशेटकडे आहे. साळवींची बायको भजनं छान म्हणते. ती टेपही साहेबानं ठेवली आहे. इतकंच नव्हे तर जोशीची बायको घरात काम करताना गुणगुणते, मधूनच जोशीला वाण्याची यादी सांगते, त्याची टेपही मोदींच्या संग्रही आहे. फर्नांडीसचा मुलगा दोन वर्षांचा असताना फर्नांडीसची बायको तिच्या मुलाशी मुद्दाम बोबडं बोलायची ते ...

ललिता . पण अशा सगळ्या बायकांच्या टेप्स का ?

घाटपांडे : ते माहीत नाही.

ललिता : माझं एक काम कराल ?

घाटपांडे : सांग.

ललिता : वाटेल ते करा, पण साहेबांकडून माझी टेप मला परत मिळवून द्या.

घाटपांडे : इम्पॉसिबल, साहेब एक वेळ मोदी अँड मोदी आख्खी कंपनी तुझ्या नावावर करून देईल पण टेप देणार नाही. तेव्हा हा विषय डोक्यातून काढून टाक. साहेब टेपचं... टेपचं काहीही करणार नाही. तू शांत हो. तुझ्या... संसाराचा प्रारंभ आहे. तो सचिन बिचारा बेचैन आहे. तेव्हा, बी जॉली ! चेहरा हसरा ठेव आणि मजेत संसार कर.

(सचिन येतो.)

सचिन : वा ! घाटपांडे, माझीच वाक्यं तुम्ही ऐकवताय.

ललिता : केव्हा आलास ?

सचिन : आत्ता एवढ्यात !

ललिता : तू किती वाजता यायचं कबूल केलं होतंस ?

सचिन : थँक् यू मि. घाटपांडे.

घाटपांडे : कशाबद्दल ?

सचिन : ललिताला तुम्ही नॉर्मलवर आणलंत.

घाटपांडे : कशावरून ?

सचिन : बायको उलट–तपासणी किंवा फायरिंग करायला लागली की ओळखावं, ती नॉर्मलला आली.

( हसत जातात. )

मोदींची केबिन.

घाटपांडे... आणि त्यांच्यासमोर साळवी, सोनाळकर, ललिता आणि दोघं. तिघं एका बाजूला शंकर.

सोनाळकर : हें कधी घडलं ?

घाटपांडे : शनिवारी साडेचार वाजता.

साळवी : तुम्ही तेव्हा ऑफिसात होतात ?

घाटपांडे : मी असा जस्ट निघालो होतो. तेवढ्यात साहेबांच्या खोलीत टेलिफोन वाजला. साहेबांनी टेलिफोन घेतला आणि मला हाक मारली. मी आत गेलो. साहेब एकदम नर्व्हस ! त्यांचे हातून फोन पडेल असं मला वाटलं. मी त्यांना सावरलं. त्यांना एकाएकी घाम आला. मी शंकरला पाणी आणायला सांगितलं. साहेबांना हॉस्पिटलमधून फोन आला होता. मिसेस् मोदी अनक्कॉन्शस झाल्या होत्या. मी साहेबांबरोबर हॉस्पिटल-

मध्ये गेलो. पंधरा मिनिटांनी मिसेस् मोदी शुद्धीवर आल्या. त्यांनी साहेबांकडे डोळे उघडून पाहयलं. त्यांचा हात हातात घेतला आणि नेक्स्ट मूव्हमेंटला मान फिरवली.

साळवी : पांडुरंग, पांडुरंग !

घाटपांडे : फार अचानक घडलं सगळं !

ललिता : जाताना काही बोलल्या का हो ?

घाटपांडे : काही नाही. अ व्हेरी पीसफुल् डेथ.

सोनाळकर : तशा यंग असतील ना ?

घाटपांडे : एकदम यंग आणि एक्सेप्शनली ब्यूटिफूल !

साळवी : शेवटी माणूस काहीतरी बोलला की बरं वाटत.

सोनाळकर : हीच मोठी गंमत आहे. आयुष्यभर तो कितीही बोलला तरी तो शेवटी काय बोलला ह्याची प्रत्येकाला उत्सुकता असते.

घाटपांडे : अगदी खरं आहे. पण तसं काही घडलं नाही. मिसेस् मोदींनी मान फिरवली. साहेबांनी डॉक्टरांना हाक मारली. त्यांनी कार्डियाक मसाज वगैरे ठरलेले प्रयत्न केले आणि न बोलता निघून गेले.

ललिता : साहेबांना भेटू या.

एकजण : आत्ताच जाऊ. तुम्हाला घर माहीत आहे ना ?

घाटपांडे : माहीत आहे. पण आठ दिवस कुणी येऊ नका, अशी साहेबांची रिक्वेस्ट आहे.

साळवी : साहेब आता महिनाभर येणार नाहीत.

घाटपांडे : साहेब आता बहुतेक ऑफिसात येणारच नाहीत. फॅक्टरीकडे बदली घेण्याच्या विचारात आहेत.

सोनाळकर : छे, छे ! असं होता कामा नये. आपण त्यांची समजूत घालू.

घाटपांडे : प्रयत्न करू, पण आय डोण्ट थिंक, ही वुईल चेंज हिज माईण्ड ! त्यांनी आपल्या सगळ्यांचा निरोपही घेतलाय्.

साळवी : कधी.

(घाटपांडे उत्तर देत नाहीत टेपरेकॉर्डर काढतात. लावतात. स्टेजवर सर्वत्र अंधार.)

मोदींवर स्पॉट.

मोदी : फ्रेंड्स, कलीग्ज,

आमी तुमच्यासंगट थोडा वार्ता करते. आफकोर्स, आय ॲम नॉट इन् मूड्स. आय ॲम टोटली अपसेट. गॉन केस. तवा बी वार्ता करते. आय वॉंट टू एक्स्प्रेस माय ग्रॅटिट्यूड्स ॲंड से यू गुडबाय्. तुमी समदे माणसने

आमाला लई को-आपरेशन दिला. आमी तुमचा गुडनेस लाइफमंदी विसरेल नाय्. घाटपांडे, तू आमचा हेडक्लार्क. लई होपलेस माणस. आमी तुमचेवर घुस्सा केला. तुला हेड नाय बोलला. पण तू कवा बी घुस्सा नाय केला. तू होपलेस हाय; बट मि. घाटपांडे, आय ॲम प्राऊड ऑफ यू ! मोदी ॲंड मोदी वुईल नेव्हर फरगेट युवर सर्व्हिसेस्. साळवीबाबा, तुमी लई पांडुरंग-पांडुरंग नको करू. तुजा तो पांडुरंग बिल्कुल डेफ ॲंड डंब हाय. तुझा पांडुरंग ब्लाईंड बी हाय. बच्चे लोगने स्टोन थ्रोईंग केला. यू वेअर हर्ट. व्हाय? बिकॉज ते पांडुरंग होपलेस हाय्. तू थोडा लाइफ एन्जॉय करेल तो पांडुरंग भेटूनशान जाईल. तुझे वाईफचे आवाजमंदी पांडुरंग हाय. तेचा टेप आमी आता वापस केला हाय. मि. फर्नांडीस, काइंडली कलेक्ट युवर कॅसेट फ्रॉम घाटपांडे. युवर सन् मस्ट हॅव बीन ग्रोन अप बाय धीस टाइम. यू वुईल एन्जॉय हिज व्हाइस व्हेन ही वॉज अ स्मॉल बेबी !

धेसपांडे, तुमी तो मला लई ओब्लाइज् केला. माय ओन डॉटर वुड हॅव नॉट डन् सच अ फेव्हर, ॲण्ड सॅक्रिफाइस फॉर मी ! आमी तुमचा कॅसेट वापस केला हाय. धेसपांडे, बिलीव्ह मी, आमा तुमचा कॅसेटचा मिसयूज केला नाय.

आमची बायडी तो आमाला सोडूनशान गेली. नाऊ आय हॅव नो इंटरेस्ट इन सर्व्हिस, नो चार्म इन लाईफ ! मिसेस् मोदी लई चांगला लेडी होती. शी वॉज अ गुड सोल. जस्ट लाइक अ डायमंड !

आमचे बायडीनं लाइफमंदी आमाला लई प्लेझर दिला. आय वॉज द हॅपीएस्ट हजबंड ! तवा बी, आमचे वाईफने एक प्लेझर आमाला कवा बी दिला नाय. डायलॉगचा प्लेझर कवा बी दिला नाय. बायडीलोग हनीमूनला वार्ता कसा करते, डिकरासंगट बात कसा करते, ते कवा बी समजला नाय. आफकोर्स, आय डोण्ट ब्लेम दॅट पुअर लेडी फॉर दॅट. शी वॉज डेफ ॲण्ड डम्ब. येस् माय कलीग्ज, मिसेस् मोदी वॉज नॉट एबल टू स्पीक ॲण्ड लिसन. शी वॉज डेफ ॲण्ड डंब ! साळवीचे पांडुरंगसारका. शी वॉज ... (मोदींचे डेफ् ॲण्ड डम्ब हे वाक्य घुमत राहतं. त्याच वेळी घाटपांडे प्रत्येकाच्या कॅसेट्स परत करतात, केबिनमधे एकटी ललिता उरते.)

मोदींच्या खुर्चीतून आवाज येतो.

'धेसपांडे, लाडू मिळाला. आता पेढा कवा देल ?'

IRBK-0119702

❀ ❀



म. गो. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
ग्रा. क्र. 95602 नों. दि. ..........
वि. नाटक क्र. 2/1/63